बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०

साप्ताहिक http://berartimes.com
# बेरार टाईम्स
मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे



गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध

आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१२ गोंदिया | अंक ३४ | बुधवार,दि. ०२ ऑगस्ट २०२३ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024

# मंडल आयोगाची माहिती जनसामान्यापर्यंत व्हावी-उमेश कोर्राम

**गोंदिया:** ओबीसी समाजाचा सर्वांगीण विकास करुन घेण्यासाठी ओबीसींची जातनिहाय जनगणना करण्याशिवाय पर्याय नसून ओबीसींनी संघटनेप्रती समर्पित भावना ठेवून काम केल्यास बळकट संघटन निर्माण होऊ शकतो. त्यासाठीच स्व.बी.पी.मंडल यांच्या नावे ओबीसींच्या आर्थिक व सामाजिक विकासासाठी गठित करण्यात आलेल्या मंडल आयोगाची माहिती जनसामान्यापर्यंत व्हावी या उद्देशाने ही मंडल यात्रा असल्याचे विचार मंडल यात्रेचे सयोंजक ओबीसी अधिकार युवा मंचचे उमेश कोर्राम यांनी व्यक्त केले.



ते आमगाव येथे मंडल यात्रेचे आगमन झाल्यानंतर येथील साईलॉन येथे आयोजित मार्गदर्शन सभेला प्रमुख मार्गदर्शक म्हणून संबोधित होते.मंचावर ओबीसी संघर्ष समितीचे अध्यक्ष बबलू कटरे,संघर्ष वाहिनीचे दिनानाथ वाघमारे,ओबीसी सेवा संघाचे अध्यक्ष प्रा.बी.एम.करकमकर,प्रशांत बेले आदी मान्यवर उपस्थित होते. प्रास्तविक ओबीसी सेवा संघाचे सावन कटरे करुन मंडल यात्रेच्या आयोजनासंदर्भात पार्श्वभूमी मांडली.

तत्पुर्वी यात्रेचे येथील महाकाली पेट्रोलपंपसमोर स्वागत करण्यात आल्यानंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकर,महात्मा गांधी व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करण्यात आले. त्यानतर ही यात्रा सभागृहात दाखल झाली. कोर्राम पुढे म्हणाले,की ओबीसींच्या विद्यार्थ्यासांठी वसतीगृह, निवासी शाळा हव्यात या गोष्टी आधीच मंडल आयोगात तरतुद करुन ठेवल्या परंतु १९९२ मध्ये जेव्हा काही प्रमाणात मंडल आयोगाच्या शिफारसी अटीशर्तीच्या आधारावर मंजुर करण्यात आल्या.तेव्हापासून आजपर्यंत महाराष्ट्रातील कुठल्याही सरकारने ओबीसी विद्यार्थ्यासांठी वसतीगृहच काय निवासी शाळा सुरु केलेल्या नाहीत.तर २०१७ पासून आम्हाला प्रत्येक सरकार व मंत्री फक्त वसतीगृहाचे आश्वासन देत राहिल्याची टिका केली.

यावेळी बोलतांना संघर्ष वाहिनीचे दिनानाथ वाघमारे यांनी सर्वसमाजाला संघटित होण्याची नितांत गरज असून मंडल यात्रेच्या माध्यमातून ओबीसी, व्हीजेएनटी, एसबीसी राज्यात वेगवेगळे असले तरी केंद्रांत ओबीसी म्हणून एकच आहेत, त्यांनी सोबत येऊन ही यात्रा समाजविकासाच्या मुद्याला घेऊन काढली आहे.समाजाला मंडलआयोग आणि समाजासाठी असलेल्या शासकीय योजनां त्यांच्यापर्यंत पोचविणे गरजेचे झाले आहे. व्यवसायिक अभ्यासक्रमात ओबीसींनी १०० टक्के शिष्यवृत्ती मिळते परंतु सरकार ते देण्यासही अत्ता टाळाटाळ करीत असल्याचे सांगितले. कारण येथील प्रत्येक व्यवस्था ही आपल्या समाजाविरोधात आहे. मागासलेल्या घटकाला प्रत्येक क्षेत्रात प्रतिनिधीत्व मिळावे यासाठी आरक्षण दिले जात असले तरी आजही न्यायपालिकेत एका विशिष्ट समाजाचे वर्चस्व कायम असल्याने त्याठिकाणाहून आपल्या विरोधातच सर्वाधिक निर्णय देऊन सविंधानाचीही पायमल्ली होत असल्याचे म्हणाले.

विदर्भातील सर्वच संघटना ओबीसींच्या मुद्यावर सातत्याने काम करीत आहेत,मात्र मंडल यात्रा ही यावेळी नवा जोश आणि समाजाला मंडल कोण होते, त्यांनी समाजासाठी काय केले याची माहिती पटवून देण्यासाठी आमच्यासारख्या काही पाच-सहा युवकांनी पुढाकार घेऊन सर्व संघटनानासोबत घेऊन काढलेल्या यात्रेला मिळत असलेला प्रतिसाद ओबीसींमध्ये होत असलेली जनजागृतीचे फलीत असल्याचे विचार मांडले. यावेळी मान्यवरांनीही विचार व्यक्त केले.

बबलू कटरे यांनी मंडल आयोग लागू करण्यात आले, तेव्हा आमच्याच ओबीसी बांधवाना मंडल आयोगाच्याविरोधात तयार करुन येथील उच्चवर्णीयानी ओबीसींना मंडल विरोधात कमंडल यात्रेत सहभागी करुन घेतल्याने आणि एससी एसटी समाजाप्रती व्देष निर्माण केल्याने ओबीसी आपल्याचा अधिकारासाठीच्या मंडल आयोगाला समजू शकला नाही. त्यामुळेच आजही आम्हाला आमच्या हक्क अधिकारासाठी आंदोलनात्मक भूमिका घेण्याची वेळ आली आहे. सरकार नौकऱ्यांचे खासगीकरण करीत असताना आम्ही त्यांचा विरोध केला नाही.

२०२० च्या नव्या शैक्षणिक धोरणामुळे शिक्षण क्षेत्रात मोठे बदल होऊ घातले असून यातून आपला समाज शिक्षणापासून वंचित राहण्याची शक्यता व्यक्त करीत ओबीसी वसतीगृह असो की निवासी शाळेच्या प्रश्नावर प्रत्येकसरकारने ओबीसीसोबत विश्वासघात केल्याचे विचार त्यांनी अध्यक्षीय भाषणात व्यक्त करीत या यात्रेच्या नागपूर येथील ७ ऑगस्टच्या समारोपीय कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले.संचालन सुनिल पटले यांनी तर आभार तिर्थराज उके यांनी मानले. आयोजनासाठी आमगाव,सालेकसा येथील कार्यकर्त्यांनी सहकार्य केले.




# आदिवासी नक्षलग्रस्त जिल्ह्यातील वर्ग १ ची पदे रिक्त, प्रशासनाची डोळेझाक

**गोंदिया:** राज्यातील आदिवासी व नक्षलग्रस्त भाग असलेल्या जिल्ह्यातील विकासाच्या योजना राबविण्याकरीता महत्वाच्या असलेल्या पदांच्या नियुक्त्या प्राधान्य त्या भागात करण्यात यावे.त्या ठिकाणच्या जागा रिक्त राहू नये असे शासनाचे धोरण असतानाही मात्र आदिवासी व नक्षलग्रस्त भागाच्या यादीत असलेल्या गोंदिया जिल्ह्यात आजही महत्वाच्या अधिकायाची पदे रिक्त असल्याचे चित्र आहे.महत्वाच्या वर्ग १ मध्ये येणार्या विविध विभागातील पदे रिक्त असल्यने प्रशासकीय कामाचा ताण निर्माण झालेला आहे. मात्र या जिल्ह्यातील रिक्त पदांना भरण्यासाठी कुठल्याही पालकमंत्र्यासह जिल्ह्यातील एकाही खासदार आमदाराने प्रयत्न केल्याचे दिसून येत नाही.



जेव्ही की नक्षलग्रस्त/ आदिवासी (विशेष घटक योजना) भागातील पदे रिकामी ठेवू नये. अधिकार्यांची नियुक्तीसाठी कम तरता असल्यास इतरत्र पदे रिक्त ठेवून या भागात अधिकाऱ्यांच्या नेमणूका करण्याचे शासनाचे स्पष्ट धोरण असतानाही गोंदिया जिल्ह्यात महत्वाची पदे आजही रिक्त आहेत.यामध्ये अतिरिक्त जिल्हाधिकारी पदापासून उपजिल्हाधिकारी,तहसिलदार,उपमुख्य कार्यकारी अधिकारी,उपविभागीय अधिकारी,समाजकल्याण उपायुक्त,समाजकल्याण अधिकारी,गटशिक्षणाधिकारी,उपकार्यकारी अभियंतासह अनेक महत्वाची पदे रिक्त असल्याने जिल्ह्यातील विकास कामावर प्रभाव पडत आहे.

विशेष म्हणजे आदिवासी क्षेत्रातील बिकट परिस्थितीत शासनाच्या योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करणार्या शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्या त्या भागात काम करताना येणार्या विविध अडचणींचा विचार करुन तसेच नक्षलग्रस्त/संवेदनशील भागात (जिवीताची) सुरक्षितता आदी बाबी लक्षात घेवून त्यांना काही प्रोत्साहनपर सवलतीही देण्यात आलेल्या आहेत.आदिवासी भागाच्या विकासासाठी राबविण्यात येत असलेल्या शासनाच्या विविध योजनांचा पुरेपूर लाभ तेथील जनतेला मिळावा. विकास व्हावा यासाठी तळमळीने काम करणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या अडीअडचणी दूर व्हाव्यात आणि त्याना जोमाने काम करण्यास प्रोत्साहन मिळावे याकरिता विविध सवलती शासनाच्या वतीने देण्यात आल्या आहेत.त्यानंतरही आदिवासी व नक्षलग्रस्त गोंदिया जिल्ह्यात अनेक पदे रिक्त पडली आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालयाचा विचार केल्यास गेल्या वर्षभरापासून अतिरिक्त जिल्हाधिकारी,उपजिल्हा निवडणुक अधिकारी,तीन वर्षापासून उपजिल्हाधिकारी भुसंपादन व रोहयो विभागाची पदे रिक्त आहेत.जेव्हा की जिल्ह्यात राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या अमलबजावणीकरीता उपजिल्हाधिकारी रोहयो यांची महत्वाची भूमिका असते.त्याचप्रमाणे ग्रामीण भागाशी जनसंपर्क असलेल्या जिल्हा परिषदेतही हीच अवस्था असून जिल्हा परिषदेत गट अ चे १७४ पदे मंजूर असून १२० पद भरलेले आहेत. तर ५४ पदे रिक्त आहेत.

गट ब मध्ये मंजूर १०६ पैकी ५६ पदे भरली असून ५० पदे रिक्त आहेत. सोबतच उपविभागीय अभियता, उपकार्यकारी अभियता, सहायक जलसंधारण अधिकारी, उपविभागीय जलसंधारण अधिकारी,कनिष्ठ भुवैज्ञानिक, सहायक जिल्हा आरोग्य अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी ३,सहायक प्रकल्प संचालक, बालविकास प्रकल्प अधिकारी २, उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी १, लेखाधिकारी २,ग्रामीण पाणी पुरवठा विभागात ६उपविभागीय अभियंत्यासह ४३ पदे रिक्त आहेत.

गोंदियात आजही अन्न औषध विभागाचे कार्यालय व अधिकारी नाही,सोबतच गोंदियाला राज्य परिवहन विभागाचे कार्यालय नाही.प्रदुर्षण मंडळाचे कार्यालयही नाही.

# कोतवाल भरतीत एकाच कुटुंबातील तीन सदस्यांना समान गुण मिळाले कसे

**तिरोडा:** तालुक्यातील तलाठी साझा क्र.१९ मोगरा येथील कोतवाल भरतीत एकाच कुटुंबातील तीन सदस्यांना समान गुण मिळाल्याने संभ्रमाचे वातावरण आहे. त्यामुळे या भरती प्रक्रियेची चौकशी करण्याची मागणी केली आहे.

जिल्ह्यात सध्या कोतवाल भरती सुरु आहे. मात्र या भरती प्रक्रियेदरम्यान काही ठिकाणी घोळ झाल्याच्या तक्रारी पुढे येत आहे. त्यामुळे या भरती प्रक्रियेवर प्रश्न चिन्ह निर्माण झाले आहे. तालुक्यातील तलाठी साझा क्र.१९ मोगरा येथील कोतवाल भरतीत एकाच कुटुंबातील तीन सदस्यांना समान गुण मिळाल्याने संभ्रमाचे वातावरण आहे.

एकाच कुटुंबातील तीन अर्जदार सदस्यांना त्यांची शैक्षणिक पात्रता वेगवेगळी असून समान गुण कसे, परीक्षेचा आसन क्रमांक कोणत्य पद्धतीने आखला होता, त्यांची उत्तर पत्रिका सर्व परीक्षार्थी यांना बोलावून प्रत्यक्षात त्यांच्यासमोर तपासण्यात यावी.

तसेच या प्रकरणाची सखोल चौकशी करुन संबंधित घोगरा सांझा क्र.१९ ची कोतवाल पदभरती रद्द करुन पुन्हा नव्याने एका महिन्याच्या आत घेण्यात यावी. यात गैरमार्गाचा वापर कोणत्याही अर्जदाराने केल्याचे आढळल्यास नव्याने घेण्यात येणाऱ्या परीक्षोतून त्यांना वगळण्यात यावे. नव्याने घेण्यात येणाऱ्या परीक्षेसाठी पात्र उमेदवाराने अर्ज केल्यास त्या अर्जदारांकडून कुठलेही शुल्क घेण्यात येऊ नये, अशी मागणी अमरदीप बडगे यांनी केली आहे.

# कन्हाळगाव येथे भांडणातून दोन गटात हाणामारी,पाच जणांचा खुणाचा प्रयत्न

**देवरी:-** तालुक्यातील ग्राम कन्हाळगाव येथे वर्षभरापासून दोन गटात सुरूअसलेल्या या ठिणगीचे वादात रूपांतर झाले. शुक्रवारी (दि.२८) दोन गटात चक्क राडा झाला.यात दोन गटातील पाच जणांच्या खुनाचा प्रयत्न झाला. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या त्या पाचही जणांना उपचारासाठी दाखल करण्यात आले. या संदर्भात शनिवारी (दि.२९) गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ग्राम कन्हाळगाव येथे शुक्रवारी (दि.२८) सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास रवींद्र चैतराम पटले (४६) यांचा मुलगा लोकेश पटले हा मागील वर्षी पाण्यात बुडून मरण पावला. परंतु माझ्या मुलाच्या मृत्यूला पवन विनोद वट्टी (२२) हा कारणीभूत असल्याचे गृहीत धरून आरोपी रवींद्र चैतराम पटले व त्यांच्या कुटुंबीयांनी नेहमीप्रमाणे शिवीगाळ केली. शुक्रवारी सायंकाळी ५ वाजता रवींद्र पटले हा शिवीगाळ करीत असताना त्यांच्यात वाद झाला. परिणामी आरोपी रवींद्र पटले, विजय मणिराम पटले (३२) व चेतराम गोपीचंद पटले (७०, तिघे रा. कन्हाळगाव) यांनी विनोद ढेकल वट्टी (४५) व पवन विनोद वट्टी (२२, दोघे रा. कन्हाळगाव) या बापलेकांवर काठीने वार करून त्यांच्या खुनाचा प्रयत्न केला. या संदर्भात विनोद ढेकल वट्टी यांच्या तक्रारीवरून देवरी पोलिसांनी आरोपींवर भादंविच्या कलम ३०७, ३२४, ५०४, ३४ सहकलम ३, २, ५ अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा अन्वये गुन्हा दाखल केला आहे. तपास तिरोड्याचे उपविभागीय पोलिस अधिकारी प्रमोद मडामे करीत आहेत.

तर दुसऱ्या गटातील विजय मणिराम पटले (३२, रा. कन्हाळगाव) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार रवींद्र पटले यांचा मुलगा लोकेश पटले हा मागील वर्षी पाण्यात बुडून मरण पावला. त्यामुळे आरोपी त्र्यंबक पुरुषोत्तम पारधी (२४) हा रवींद्र पटले यांना पाहून हसत असतो. त्यामुळे अधिक चिडलेल्या पटले कुटुंबीयांचा आणि वट्टी कुटुंबीयांचा वाद झाला. या वादात दुसऱ्या गटातील आरोपी विनोद वट्टी, पवन उर्फ रितिक वट्टी व त्र्यंबक पारधी (२४, तिघे रा. कन्हाळगाव) यांनी भांडण करून विजय पटले (३२), रवींद्र पटले (४६) व शेवंता चैतराम पटले (६५, तिन्ही रा. कन्हाळगाव) यांच्या डोक्यावर काठीने मारून त्यांच्या खुनाचा प्रयत्न केला.

या घटनेत एकंदरीत पाच जणांच्या खुनाचा प्रयत्न झाल्याने विजय पटले यांच्या तक्रारीवरून तिघांवर भादंविच्या कलम ३०७, ३२६, ३२४, ५०६, ३४ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. तपास सहायक पोलिस निरीक्षक मुकुंद जाधव करीत आहेत. ते पाचही लोक गंभीर असून त्यांच्यावर उपचार सुरूआहेत.

# दहशतवादी अब्दुल कादीर पठाण तबलीग जमातचा कार्यकर्ता

**गोंदिया:** पुणे येथे अटक झालेल्या दहशतवाद्यांच्या माहितीत गोंदियातील अब्दुल कादीर दस्तगीर पठाण (वय ३५, रा. महकनाज, कान्हरटोली, हनुमान मंदिराजवळ, बापट लॉन गोंदिया) हा तरुण पुणे दहशतवाद्यांच्या सोबत कार्य करीत असल्याचे पुढे आल्यानंतर पुणे येथील दहशतवादी विरोधी मोहिमेच्या अधिकाऱ्यांनी त्याला अटक केली. त्याच्याकडून कसून चौकशीसाठी त्याला ३० जुलै रोजी पुन्हा गोंदियात आणण्यात आले. त्याची कसून चौकशी करून त्याच्या संगणकातील मोठ्या प्रमाणात डाटा एटीएसची चमू घेऊन गेली आहे. तो पुण्यातील तबलीग जमात मस्का येथील कार्यकर्ता असल्याचे तपासातून पुढे आले आहे.गोंदिया व गोरेगाव येथे पदवीपर्यंत शिक्षण घेतलेल्या कादीर दस्तगीर पठाण (वय ३५) याला दोन भाऊ व आई असून ते गोविंदपूर येथे राहतात. त्याने आपल्या आत्यासोबतच विवाह केल्यामुळे त्याच्या कुटुंबीयांनी त्याला घराबाहेर काढले. तो कन्हारटोली येथे सासरी राहू लागला. १२ वर्षांपूवी तो नोकरीच्या शोधात पुणे येथे गेला. तिथे त्याने ग्राफिक डिझायनर म्हणून वेगवेगळ्या कंपन्यांमध्ये काम केले. सहा वर्षांपूवी त्याने पुण्याचा फैदाने मदिना मस्क, ब्राइट फ्युचर स्कूलसमोर पुणे हा परिसर गाठला. त्या ठिकाणी तो राहू लागला. तो आधी सुन्नी पंथाचे अनुसरण करीत होता; परंतु पुण्यात आल्यावर अहले-हदीसचे अनुसरण करू लागला.

# कामठा-परसवाडा मार्गामुळे रखडला बिरसी विमानतळ धावपट्टीचा विस्तार

## फ्लाय बिग कंपनीची सेवा पाच महिन्यांतच बंद पडली

**गोंदिया:** शहराजवळ असलेल्या बिरसी विमानतळाच्या धावपट्टीचा विस्तार कामठा-परसवाडा मर्गामुळे रखडला आहे. सध्याच्या परिस्थितीत येथे प्रवासी विमान सेवा कधी सुरु होईल, हे कोणीही सांगायला तयार नाही.

नागरी विमान वाहतुकमंत्री ज्योतिरादित्य सिंधीया यांनी गेल्या वर्षी १३ मार्च रोजी येथे फ्लाय बिग कंपनीच्या विमान सेवेचे उद्घाटन केले होते. ही कंपनी इंदूर-गोंदिया-हैदराबाद-गोंदिया-इंदूर ही दोन विमाने संचालित करीत होती. परंतु ही सेवा पाच महिन्यांतच बंद पडली. दरम्यान, सिंधीया यांनी येथून कार्गो विमान सेवा सुरु करण्याचा विचारही व्यक्त केला होता. आवश्यक लांबीची धावपट्टी नसल्यामुळे तो प्रस्तावदेखील पूर्णत्वास गेला नाही.

या विमानतळाची धावपट्टी ३००० मीटरची होती. कामठा-परसवाडा मार्गामुळे ती लांबी २१३५ मीटरपर्यंत कमी करण्यात आली. ही धवपट्टी अपुरी पडते. ही समस्या दूर करण्यासाठी कामठा-परसवाडा मार्ग दुसरीकडे वळविणे आवश्यक आहे.



### रात्रकालीन लॅंडिगची सुविधा बंद

**या ठिकाणी रात्रकालीन लॅंडिगची सुविधा होती. परंतु भारतीय विमानतळ प्राधिकरणाने कोरोना काळात ही सुविध बंद केली. या संबंधित उपकरणे कोलकाताला पाठविली. त्यामुळे नागरिकांमध्ये रोष आहे. सध्या येथे सरकारी व खासगी वैमानिक प्रशिक्षण सुरू आहे.**

### २००५ मध्ये आधुनिकीकरण

**हे विमानतळ ब्रिटीशकालीन आहे. ब्रिटीश सरकारने द्वितीय महायुद्धाच्या वेळी १९४२-४३ मध्ये हे विमानतळ तयार केले. १९८४ मध्ये प्रिंस फिलीप या विमानतळावर उतरले होते. तत्कालीन नागरी विमान वाहतुमंत्री प्रफुल्ल पटेल यांच्या प्रयत्नांमुळे २००५ मध्ये या विमानतळाचा १२६७ एकरात विस्तार झाला. या विमानतळामध्ये विविध आधुनिक सुविधा आहेत.**

**बिरसी विमानतळाच्या धावपट्टीचा विस्तार कामठा-परसवाडा मार्गामुळे रखडला आहे. हा मार्ग दुसरीकडे वळविण्यासाठी सरकारला प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. सरकारच्या निर्णयानंतर अडथडा दूर होईल.**

**शफिक शाह, संचालक बिरसी विमानतळ**

# पूर परिस्थितीवर मात करण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज-जिल्हाधिकारी गोतमारे

## जिल्हाधिकाऱ्यांनी केली पूर प्रवण गावांची पाहणी, गोंदिया व तिरोडा तालुक्यातील नागरिकांशी साधला संवाद

**गोंदिया :** सद्यस्थितीत राज्यात पूर सदृश परिस्थिती असल्यामुळे अनेक जिल्ह्यात पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. मान्सून कालावधीत पूर परिस्थिती हाताळण्यासाठी जिल्हा प्रशासन ताकदीने सज्ज आहे, असे वक्तव्य जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनी २५ जुलै रोजी गोंदिया व तिरोडा तालुक्यातील संभाव्य पूर प्रवण गावांची पाहणी दरम्यान केले.



जिल्ह्यातील ९६ गावांना पुराचा संभाव्य धोका आहे. मान्सून कालावधी सुरु झाला असून जिल्ह्यात पावसाने दमदार हजेरी लावली आहे. मागील आठवड्यात गोंदिया जिल्ह्यात अतिवृष्टीची नोंद करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनी पूर प्रवण गावांची भौगोलिक परिस्थिती पाहण्याकरिता गोंदिया तालुक्यातील कोरणी घाट, रजेगाव, बिरसोला, कासा, काटी, पुजारीटोला व तिरोडा तालुक्यातील कवलेवाडा, किडंगीपार, ढिवरटोला या गावांना भेट देवून स्थानिक लोकांशी संवाद साधला. यावर्षी करण्यात आलेले पूर परिस्थितीचे नियोजन व भौगोलिक परिस्थितीचीही त्यांनी पाहणी केली.

यावेळी जिल्हाधिकारी यांच्या समवेत तहसिलदार गोंदिया समशेर पठाण, तहसिलदार तिरोडा गजानन कोकाड्डे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी राजन चौबे, कार्यकारी अभियंता राज कुरेकर, जिल्हा माहिती अधिकारी रवी गीते, पूर नियंत्रण अधिकारी महेश भेंडारकर आणि कनिष्ठ अभियंता प्रविण कहार प्रामुख्याने उपस्थित होते.

जिल्ह्यात वर्ष २०२२ मध्ये ऑगष्ट महिन्यात गोंदिया व तिरोडा या दोन तालुक्यात पूरपरिस्थिती निर्माण झाली होती. या दरम्यान पूरपरिस्थितीमध्ये जीवित व वित्तीय हानी तसेच शेतकऱ्यांचे घर, गोठे, जनावरे व शेत पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. सदर घटनेची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनी पूरप्रवण गावांना प्रत्यक्ष भेट देऊन तेथील भौगोलिक परिस्थितीची पाहणी केली व पूर येण्याची कारणे तसेच पूर परिस्थिती दरम्यान शोध व बचाव करण्याकरीता प्रशासनाद्वारे करण्यात आलेल्या उपाययोजनेची माहिती उपस्थित अधिकारी, कमचारी यांच्याकडून जाणून घेतली.

वैनगंगा व बाघ नदीच्या काठावर असलेली गावे व खोलगट भागातील घरांमध्ये पुराच्या पाण्यामुळे होणारे नुकसान तसेच वेळेवर शासनाकडून तात्काळ मदत देण्याकरीता बोटीची व मनुष्यबळाची पुरेशी व्यवस्था इत्यादीबाबत जिल्हाधिकारी यांनी विस्तृत माहिती घेतली. तसेच जिल्हाधिकारी यांनी यावेळी उपस्थित गावकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या समस्या देखील जाणून घेतल्या.

यावेळी गोंदिया आणि तिरोडा तालुक्यातील पूर प्रवण गावांचे सरपंच, उपसरपंच, मंडळ अधिकारी, तलाठी, पोलीस पाटील, कोतवाल, जिल्हा आपत्ती प्रतिसाद दल व नागरीक बहुसंख्येने उपस्थित होते.

**जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांचे नागरिकांना आवाहन**

आपत्ती दरम्यान नागरिकांच्या कोणत्याही मदतीसाठी जिल्हा प्रशासन सज्ज आहे. प्रशासनाने व नागरिकांनी एकमेकांशी समन्वय ठेवून पूर परिस्थितीवर मात करण्यासाठी एकत्रित यावे. सद्यस्थितीत धरण, जलाशय इत्यादींमध्ये पाण्याची पातळी वाढत असून पाण्याच्या विसर्गामुळे नदी काठावरील गावांमध्ये संभाव्य पूर परिस्थितीचा धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तरी जिल्ह्यात पूरपरिस्थिती नाही. परंतु सद्यस्थितीत धरण, जलाशय, तलाव, नद्या, नाले इत्यादींमध्ये पाण्याची पातळी वाढली असून अशा ठिकाणी पाण्याच्या प्रवाहात उतरू नये. तसेच या ठिकाणी सेल्फीचे मोह टाळावे व पाण्यात बोटिंग करतांना लाइफ जॅकेटचा वापर करावा तसेच बोटीमध्ये क्षमतेपेक्षा जास्त नागरिकांनी बसू नये. पुलावरून पाणी वाहत असताना नागरिकांनी पूल ओलांडण्याचा प्रयत्न करू नये, या दरम्यान विशेष खबरदारी घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनी जिल्ह्यातील नागरिकांना केले आहे.

साप्ताहिक
बेरार टाईम्स
निर्भिड, निष्पक्ष लोकप्रिय साप्ताहिक http://berartimes.com
बुधवार,दि. ०२ ऑगस्ट २०२३


## संपादकीय

### कसोटी मानवता व्यवस्थापनाची

आपण दैनंदिन जीवनात वर्तमानपत्र, प्रसारमाध्यमांतून, प्रत्यक्षपणे हृदय पिळवटून टाकणा-या घटना वाचत, ऐकत, पाहत असतो. मात्र अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून वैयक्तिक पातळीवर खरंच सतर्कता बाळगतो का? हा आत्मचिंतनाचा विषय आहे. कारण घटना दुसऱ्यांसोबत घडलेली आहे. जोपर्यंत त्याची झळ आपल्याला लागत नाही तोपर्यंत त्याला गांभीर्याने न घेणे ही मानवी प्रवृत्ती वाढीस लागलेली आहे. सर्वसामान्यांपासून लोकप्रतिनिधी, प्रशासकीय यंत्रणा यांचा यात समावेश होतो.

आम्ही स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव जल्लोषात साजरा केला म्हणून स्वतःची पाठ थोपटून घेताना स्वातंर्त्याचा शताब्दी महोत्सव निर्भयपणे अनुभवण्यासाठी नवीन पिढीला गुणवत्तेची भेट देणार आहोत का? त्यांचे ध्येय गाठण्यासाठी नेतृत्वगुण व व्यवस्थापन कौशल्य याची कसोटी लागणार. त्यासाठी शिस्त स्वयंप्रेरित हवी. गुणवत्ता ही काही लाट नाही, आली आणि गेली. गुणवत्ता ही सर्वत्र लागू पडणारी संकल्पना आहे. वस्तुस्थितीमध्ये सतत सुधार घडवून आणण्यासाठी निरंतर सतर्क राहणे अपरिहार्य आहे. त्यामध्ये व्यक्ती, सेवा, संस्था यांचा विचार केल्यास गुणवत्तेचे अस्तित्व किंवा तिचा अभाव सहज लक्षात येतो. गुणवत्ता ही व्यक्तिनिष्ठ असते. त्यासाठी मानवी संसाधनांचा विकास, तणावमुक्त वातावरण, समस्यांचे पद्धतशीर निरसन होणे आवश्यक आहे.

निव्वळ घोषणा या व्यक्ती-व्यक्तींमधील संबंधात क्लिष्टता निर्माण करतात. लोकप्रतिनिधींनी याचा दूरगामी विचार करून त्यांची बांधिलकी लक्षात घेतली पाहिजे; परंतु आधुनिक भारताचे लोकप्रतिनिधी सत्तेसाठी केव्हा एकमेकांचा गळा पकडतील आणि केव्हा गळाभेट घेतील, याची शाश्वती नाही. त्यामुळे प्रशासकीय यंत्रणातील व्यक्तींनाही मनमानी कारभार करण्यासाठी रान मोकळे झालेले आहे. त्यामध्ये शोषण होत आहे. यांच्या पायाशी निर्बुद्धपणे स्वाभिमान गहाण ठेवणाऱ्या त्यांच्यामागे वाहवत जाणाऱ्या जनतेचे.

मणिपूर राज्यात मागील दोन महिन्यांपासून अधिक काळ हिंसाचारात होरपळणारी संतापजनक आणि मानवतेला अत्यंत लाजिरवाणी महिलांना विवस्त्र करणारी घटना. तीन वर्षापूर्वी महाड येथील तळीये वाडीत घडली, त्याच घटनेची पुनरावृत्ती खालापूर येथील इर्शाळवाडीतील दरड कोसळण्याची घटना, दक्षिण गोव्यात सापडलेल्या खाणीतील दगड फोडण्यासाठी मनाई असलेल्या स्फोटकांची घटना, अमली पदार्थ तस्करीचे वाढते प्रमाण व युवा पिढीकडून सेवन, धरण क्षेत्रातील अतिवृष्टीच्या घटना, अंबरनाथ लोकल प्रवासातील ४ महिन्यांचे बाळ नाल्यात पडून वाहून गेल्याची घटना, अपघातात मरणाऱ्याच्या वारसाला सरकार नुकसान भरपाई देते म्हणून मुलाच्या कॉलेजची फी भरण्यासाठी तामिळनाडूमध्ये बससमोर उडी घेणारी माऊली, उच्चभ्रू इमारतीत आग लागलेली असताना ती विझ-वताना अग्निशमन दलाच्या कार्यात अडथळे येणार नाहीत, याची दक्षता न घेता त्याचे चित्रीकरण करण्यात मग्न होऊन त्या गर्दीत स्वतःच्या लहान मुलांना मोकळे सोडणारे पालक, स्टेअर केस आणि रिफ्यूजी एरियाच्या जागेचा उपयोग कपडे सुकवण्यासाठी करणे अशा कित्येक घटना सांगतात आपत्ती या मानव निर्मितच आहेत.

प्रशासकीय यंत्रणातील कामचुकार भ्रष्ट व्यक्तींसोबत नियमांचे पालन न करणारी जनताही तितकीच जबाबदार आहे. त्यासाठी मोफत चित्रपट दाखविण्यात चढाओढ करण्यापेक्षा आत्मसन्मान, आत्मविश्वास व धैर्य वाढीसाठी परिस्थिती व्यवस्थापन कौशल्य प्रशिक्षण देणे महत्वाचे आहे. स्थानिक लोकप्रतिनिधी आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी उत्सवांचे इव्हेंट करण्यापेक्षा आपल्या विभागातील नागरिक सुरक्षित आणि सुखसोयीयुक्त जीवन जगण्यासाठी विविध कौशल्य प्राप्त करून समाज आणि परिसर आदर्श कसा करू शकतो, यावर जातीभेदाचे राजकारण न करता कृतिशील राहणे महत्त्वाचे आहे. लोककल्याण आणि सुरक्षिततेची जबाबदारी केवळ शास्त्रज्ञ, शेतकरी, सैनिक यांची नसून केवळ एक दिवस राष्ट्रप्रेम आणि बाकी दिवस मनोरंजन हे चित्र बदलण्यासाठी संविधानाने अधिकार दिलेल्या प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. त्यासाठी लोकशाहीत संस्कारक्षम, अभ्यासू, जनसेवेची तळमळ असलेले आणि निःस्वार्थी भावनेने समाजाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी इच्छूक असलेले प्रतिनिधी मतदारांनी आपल्या पवित्र मतदानाद्वारे निवडले तर आजच्यासारखी राजकीय परिस्थिती निर्माण होणार नाही. मतदाराला आणि प्रामाणिक कार्यकर्त्यांना लोकशाही मूल्य जपण्यासाठी प्रतिभा संपन्न लोकप्रतिनिधी ओळखता आले पाहिजेत. जनता एकत्र नसल्याने जनतेच्या प्रश्नांचे भांडवल करून स्वतःच्या कुटुंबाचाच विकास साधणारे राजकीय पुढारी मनमानी पद्धतीने लोकशाहीची विटंबना करत आहेत. कटकारस्थानात व्यस्त असलेल्या दुर्योधनांकडून लोकशाहीचे वस्त्रहरण थांबवायचे असल्यास सुदर्शन चक्रधारी श्रीकृष्ण प्रत्येक घरात निर्माण झाले पाहिजेत.

जनतेचा व्यवस्थापनातील सहभाग आदी कार्यक्रमांनी स्वयंशिस्त कशी निर्माण होते, यावर लक्ष केंद्रित होणे महत्त्वाचे आहे. जिथे कुठे गर्दी असेल तिथे शिस्तीच्या पालनाची आवश्यकता असते. शिस्तीचे पालन न झाल्यास बेबंदपणा निर्माण होऊन कार्यात अवरोध निर्माण होतो. ज्यांच्यात जबाबदारीची जाणीव कमी असते, मनावर नियंत्रण ठेवण्याची क्षमता कमी असते, त्यामुळे वेगाने अधोगतीने धाव घेणाऱ्या मनप्रवृत्तीस रोखण्यास सुसंस्कार व योग्य नियंत्रणाची आवश्यकता आहे. संविधानाने घालून दिलेल्या नियमांचे तंतोतंत पालन करणे म्हणजे शिस्त होय. हे नियम तयार करताना देशातील वातावरण चांगले राहील व व्यवस्थापनात अडचणी येणार नाहीत, याचा विचार केलेला आहे. अंतर्बाह्य शिस्तपालन होणे हे व्यवस्थापनाचे अंतिम लक्ष असायला हवे. स्वयंप्रेरित शिस्त एका दिवसात निर्माण होत नाही. नागरिकांमध्ये सदसदविवेकास जागृत करुनच हे काम होऊ शकते. शिस्तीच्या विभिन्न नियमांच्या कार्यकारणभावाची चर्चा करुन नियमांचे महत्त्व पटवून द्यावयास हवे. गुन्ह्याच्या किंवा नियम भंगाच्या प्रमाणात शिक्षा असावी. ऊठसूठ आर्थिक दंड करणे या शिक्षा योग्य ठरत नाहीत. नियमांचे पालन करण्याची प्रवृत्ती निर्माण होणे महत्त्वाचे आहे.

समाजकल्याण तसेच महिला व बाल विकास विभागाच्या माध्यमातून क्रीडा, वैद्यकीय तपासणी, व्यावसायिक मार्गदर्शन, कला, विज्ञान छंद गृहे, स्वसंरक्षण प्रशिक्षण, शाळा-महाविद्यालयातील सुरक्षा, स्वच्छतागृह, वसतिगृह, पटांगणे, बस सेवा, वाहन स्थानक यांची सुविधा सर्व स्तरावर पुरविणे महत्त्वाचे आहे. त्याचबरोबर फुकटेपणाच्या प्रवृत्तीची जोपासना नको. तरुणांना समाजाचे व त्यात घडणाऱ्या विविध घडामोडींचे निरीक्षण म्हणून नेतृत्व पल्लवित करण्याची व त्याला समाजोपयोगी, राष्ट्रोपयोगी आकार देण्याची विशेष आवश्यकता आहे. मित्रपरिवारामुळे त्यांच्यात काही दोष शिरलेले असतात. ज्यांची बौद्धिक विकास आणि क्षमता शालेय विषय ग्रहण करण्याची नसते किंवा त्यांना शालेय शिक्षणात अभिरूची नसते त्यांचा विविध मार्गांनी शोध घेऊन मार्गदर्शन करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी प्रशिक्षित समाजसेवक, विषयाचे तज्ज्ञ मार्गदर्शन करून विकास घडवून आणू शकतील. जेणेकरुन ते समाजाला त्रासदायक ठरू शकणार नाहीत. इतरांकडून आपली फसगत होऊ नये व जगातील विविध क्षेत्रातील ज्ञान आपणास असावे, असे वाटते. अशा लोकांना आवश्यक ते ज्ञान देऊन समाजाचा उपयुक्त घटक होण्याकरिता समाजशिक्षण योजना राबविल्या पाहिजेत.

देशातील नागरिकांचे मनस्वास्थ्य सांभाळता आले पाहिजे. मनाचे आरोग्य म्हणजे कोणत्याही घटनेने एकदम उत्तेजित व हतोत्साहित न होण्याची वृत्ती, कोणत्याही घटनेचा शांतपणे कार्यकारणभाव शोधून परिस्थितीला योग्य वळण देण्यासाठी कार्ययोजना तयार करण्याची प्रवृत्ती निर्माण होणे आवश्यक आहे. नागरिकांनी वेळेचे कारण न देता नैतिक जबाबदारी म्हणून प्रशिक्षणास प्राधान्याने प्रतिसाद दिलाच पाहिजे. प्रत्येकाचे शारीरिक व मानसिक आरोग्य चांगले राहावे व त्यात निर्माण होणारे छोटे दोष त्वरित दूर करता यावेत याकरिता सर्व पातळीवर अनुपदेशनाची व्यवस्था केल्यास मानवतेचे व्यवस्थापन करणे सोपे जाईल. जयहिंद !

**सुरक्षा घोसाळकर,** पवई, मुंबई

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,चंचलबेन स्कूल रोड, गजानन कॉलनी गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबावदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# सत्यशोधकी साहित्यातील स्त्री प्रतिमा



सतीश जामोदकर
हिवरा बु.मानोरा, वाशिम मो.९४२३३७४६७८

महात्मा फुले नंतर सत्यशोधकी साहित्याचा जोरकस एकप्रभाव निर्माण झाला. स्त्री शिक्षणाचा पुरस्कार सुरु झाला. याच काळात सावित्रीआई फुलेंनी सत्यशोधकी साहित्याची निर्मिती केली. सावित्रीआईंनी इतिहास काळातील दाखले देत, महादेव हा आपल्या पत्नीला म्हणजे पार्वतीला समतेने वागवितो हे दाखविले तर द्रोपदीला त्या जनार्दन मानतात. सगुणाबाई क्षीरसागर या जोतीरावांच्या मावस बहीण होत्या. त्यांचे फुले दाम्पत्यावर फार उपकार होते. त्यांची प्रतिमा रेखाटताना सावित्रीआई त्यांच्या कृतज्ञता व्यक्त करताना लिहितात,

आमची आऊ, फार कष्टाळू प्रेमळ होती, होती दयाळू, सागर वाटे, उथळ क्षणी, आभाळ ठेंगणे तिच्याहूनी, आऊ आमच्या घरी आली, टाक होऊ नं, पहा बैसली, मुर्तिमंत जणू, विद्यादेवी, हृदयी आम्ही, तिला साळवी.

सगुणाबाईंचे मोठे पण सिद्ध करताना सावित्रीआईंनी कर्त्या पुरुषाच्या नावाने चांदीच्या पत्र्यावर मुर्ती कोरुन ती देव्हाळ्यात ठेवतात. त्यास टाक म्हणतात. त्याप्रमाणे त्या महान आहेत. हे आपल्या काव्यातून मांडले. सावित्रीआईंनी ताराराणी यांच्यापुढे छत्रपती विशेषण लावून रणदेवाई असा गौरव केला आहे.

ज्या काळात विष्णू जनार्दन पटवर्धन हे हंबीरराव व पुतळीबाई यासारख्या कांदबऱ्यात अकल्पित अद्भूत रम्ळ स्त्री देहाचे श्रृगांरिक चित्रण करण्यात गुंतले होते ते त्याचेवळी कृष्णराव भालेकर उपदेशपर लावण्या करीत होते. त्यामध्ये श्रृंगार प्रेमभाव यांना स्थान नव्हते. तर बळीचा पाटील ही कादंबरी लिहून त्यांनी त्यामध्ये विधवा स्त्रियांना दु:ख मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

कामगार नेते नारायण मेघाजी लोखंडे यांनी सुद्धा सत्यशोधकी विचारधारेतून लेखन केले. बालकामगार व स्त्रिया यांना कमी मजुरी देऊन १०-१२ तास काम घेतले जाई त्यांचा प्रश्न पंचदर्पण या पुस्तकातून त्यांनी वाचा फोडली. अशाच प्रकारची शोषित स्त्रियांच्या प्रति आपल्या साहित्यात मांडून काही सत्यशोधकांनी स्त्री-पुरुष विषमतेला विरोध केला.

जागतिक पातळीवर आद्य स्त्रीवादी लेखिका म्हणून ज्यांचा सम्मानाने उल्लेख केला जातो. त्या म्हणजे विदर्भातील बुलडाणा येथील ताराबाई शिंदे होत. ताराबाई शिंदेचे वडील बापुजी ही शिंदे हे महात्मा फुलेंच्या सत्यशोधक समाजाचे सदस्य होते. शिंदेचे घर सत्यशोधकी विचाराचे होते. त्याचा परिणाम ताराबाई शिंदे यांच्यावर झाला होता. त्यामुळेच त्यांना घरात स्त्री शिक्षा घेता आले. मराठीसोबतच हिंदी, संस्कृत व इंग्रजी भाषेवर त्यांना प्रभुत्व मिळविता आले. त्या काळातील वृत्तपत्रे ही वैचारिक ग्रंथ तसेच मुक्तामाळ, मंजूघोष स्त्रीचरित्र, विरुद्ध स्त्रीचरित्र मनोरमा इत्यादी स्त्रीरेखा रेखाटलेली पुस्तकेही वाचली होती. त्यांनी त्यावर अभिप्राय दिला होता की, त्यातील नायिका उपनायिकांचे विकृत वर्णण केलेले आहे. महात्मा फुलेंची विचारसरणी विश्लेषण पद्धती, मीमांसा पद्धती ताराबाई शिंदे यांनी स्विकारली होती. त्यात स्वत:ची भर घालून स्त्रीवादी अन्वेषण पद्धती विकसीत केली. हे त्यांचे जागतिक पातळीवरील स्त्रीवादी साहित्याला मौलिक योगदान होते. त्यांनी आपल्या साहित्यातून पुरुषप्रधान समाजाला सडेतोड प्रश्न विचारणारी स्त्री अशी प्रतिमा रेखाटली आहे.

त्या लिहितात, की, स्त्रीचे पुरुषावर अतोनात प्रेम असते. ती प्रेमस्वरूप असते. यासाठी त्या सत्यवानाच्या सावित्रीचे उदाहरण देतात. वेगळ्या अर्थाने त्या विचारतात की, सत्यवानाची सावित्री आपल्या मृत पतीने प्राण परत आणण्यासाठी यम दरबारात गेली. परंतु एखादा पुरुष आपल्या प्रिय पत्नीने प्राण आणण्यासाठी यम दरबारापर्यंत तर सोडा पण दरबाराच्या वाटेवरी तरी गेला होता का, असे कोणी ऐकले काय? यातील पौराणिक भाग सोडला तरी स्त्री पुरुषावर किती प्रेम करते त्या प्रमाणात पुरुष करतो का? असे त्यांनी पुरुषप्रधान व्यवस्थेला विचार प्रवर्तक प्रश्न विचारले आहेत.

विधवा स्त्रियांना पशुप्रमाणे वागविले जाते. तिच्या भावनांची कदर केल्या जात नाही. तिला कुणी प्रेमाने वागवत नाही. तिच्या कार्याची साधी स्तुती तर सोडा परंतु वाच्यताही कुणी करीत नाही. स्त्रीने हट्ट केला तर तिच्या पाठीचे धिरडे केले जाते आणि जन्मभर विसतर न येण्यासारखी ती आठवण मात्र राहते. पुरुषांना त्यांनी अक्कलहुशार कोल्हे म्हटले.

स्त्री-पुरुष यांच्यात केले भेदाभेद हे त्यांनी स्त्री-पुरुष तु-लना या आपल्या ग्रंथात स्पष्ट करुन दाखविला आहे. १९ व्या शतकाच्या अखेरीस एवठी विद्रोही परंपराविरोधी शासत्रीय मांडणी जागतिक वाङ्मयात झाली नव्हती. १९७५ मध्ये चीनमध्ये बीजिंग येथे आंतरराष्ट्रीय महिला वर्षानिमित्त भरलेल्या परिषदेत ताराबाई शिंदेच्या विचारांची सरशी झाली आणि जागतिक पातळीवरील आद्य स्त्रीवादी लेखिका म्हणून त्यांना मान्यता मिळाली. हा मान सत्यशोधक परंपरेला आणि मराठी भाषेला मिळाला ही वैदर्भियांसाठी अभिमानाची बाब होती.

ताराबाई शिंदे यांची लेखनशैली बोलीभाषेशी मिळती-जुळती आहे. त्यामध्ये वाक्यप्रचार आणि म्हणीचा उपयोग केला आहे. प्रारंभी या ग्रंथाला विरोध झाला. महात्मा फुलेंनी या ग्रंथाची तारीफ केली. यानंतरच विधवांचे दु:ख साहित्यात विशेषत: मराठीत मांडण्याचे धाडस इतर ब्राम्हण साहित्यकांना झाले. त्याचेही श्रेय ताराबाई शिंदे यांनाच जाते.

भाऊराव गमचंद्र पाटोळे, भिलवडीकर यांनी गृहकलह नावाचे वग लिहिले. त्यामध्ये स्त्रियांच्या वेगवेगळ्या प्रतिमा रेखाटल्या आहेत. हुंडयामुळे नववधू स्त्रीची काय अवस्था होते, ही वाळूबाई या प्रतिमेच्या आधारे आपल्या वगात व्यक्त केली. स्त्रिया कशा बला व दासी म्हणून वागविल्या जातात आणि आपला छळ होऊ नये म्हणून काय काय सहन करतात.

पुरुषी व्यवस्थेच्या कशा गुलाम होऊन जगतात, त्याचे वर्णन केले ते असे,

मजवर रुसता का, नाथा कारण नसता, का स्वार्थासाठी खटपट मोठी, भलतीच करता का, उंदड असता दौलत आपली परिधना भूतला का, माया ममता का सोडोनी निर्दय होता का, अपराधाविना उगीच छळीता, आ-पुली कांता का.

दारूमुळे माणूस व्यसनी होतो व पशुप्रमाणे वागतो तेव्हा दौलत रावांची पत्नी सुंदर त्यास दारू सोडण्यासाठी कशी विनवनी करते ते दारूबाजी या वगात मांडले आहे. विधवापण या वगला करुणरस व्यक्त केला आहे. त्यातील यमुना म्हणते.

सुंदर तरुण कोमल काया,
केसावाचूनी जाईल वाया,
जळो व पण ते राहू द्या, काका सोडा.

भीमराव महामुनी हे आद्य सत्यशोध जलसकार म्हणून ओळ-खले जातात. त्यांच्या जलशातील यमू जे पद गाते याप्रमाणे.

मी लाडकी, अण्णा तुमची लाडकी, मला कशी करिता बोडकी,

माझ्या स्वरूपाची तऱ्हा, जसा कोंदणी हिरा.

स्त्रीला त्यांनी कोंदणी हिरा म्हटले आहे. अशा प्रकारचे लिखाण सत्यशोधकी साहित्यातच आढळून येते. भीमराव महामुनींनी एका विधवा तिही ब्राम्हण तरुणी मुलींची व्यथा व तिच्या भावभावनांचा अविष्कार आपल्या पदातून मांडला आहे. सत्यशोधकांनी आपल्या साहित्यातून फक्त ब्राम्हणेत्तर स्त्रियांचे प्रश्नच मांडले नाहीत तर ब्राम्हण स्त्रियांनासुद्धा शुद्रासारखी वागणूक मिळते त्याचेही वर्णन आपल्या साहित्यातून केले आहे.

मुकुंदराव पाटील यांनी होळीची पोळी ही पहिली कादंबरी दीनमित्रमधून क्रमश: प्रकाशित केली. याकाळी नियमकातिकांमधून क्रमश: प्रसिद्ध करणे प्रकरणांना शीर्षके अशी पद्धत होती.

या कादंबरीत धाडसी तरुण व तरुणी यांची प्रतिमा त्यांनी रेखाटली आहे. ग्रामीण भागात मानपान, खोटी प्रतिष्ठा त्यामुळे प्रगती खुंटली आहे. त्याचा फायदा शेटजी-भटजी, आ-पला स्वार्थ साधण्याकरिता घेतात असा सत्यशोधकी दृष्टीकोन या कादंबरीत व्यक्त होतो. दादासाहेबांची फजिती अथवा चंद्रलोकीची विलक्षण रुढी या कादंबरीत स्त्रियांना दुय्यम स्थान, पुरुषप्रधान रुढ, ग्रंथ, परंपरा, स्त्रियांची कोंडी, गुलामी घुसमट यांचे चित्रण करण्यासाठी मुकुंदराव पाटील यांनी चमत्कारीक कल्पनेचा आधार घेतला. या कादंबरीत चंद्रलोकावर सामाजिक चालिरिती विलक्षण आहेत. तेथे स्त्रियांना पुरुषापेक्षा मान, सम्मान, प्रतिष्ठा जास्त आहे. तर पुरुषांना गौण स्थान आहे. पृथ्वीवरील रुढीच्या नेमक्या उलट्या रुढी येथे आहेत. चमत्कारीक कल्पनेचा आधार जरी येथे घेतला असेल तरी पुरुषांनी स्त्रियांच्या समस्यांचा, दु:खाचा वेदनेचा, त्यांचप्रमाणे परवशतेचे जीवन आपल्या म्हणजे पुरुषांच्या वाटेला आले तर आपण सहन करु शकू का? असा विचार करावा आणि स्त्रियांना समानतेची वागणूक द्यावी, असा सत्यशोधकी दृष्टीकोन व्यक्त केला आहे. या कादंबरी केंद्रवर्ती आशय स्त्रियांची दु::खे उजगार करण्याचा आहे. तसेच जहागीरदार, इनामदार, देखमुख, पाटील यांच्या घरातील स्त्रियांची दु:खे अमर्याद आहे. त्याचे चित्रण कादंबरीकाराने केले आहे. मुकुंदराव पाटलांनी याशिवाय तोबा-तोबा, राष्ट्रीय तारुण्य यासारख्या कादंबरीतून वेगवेगळ्या स्त्री प्रतिमा रेखाटण्याचा प्रयत्न केला. तसेच त्यांनी नाटके खंडकाव्ये यामधून सुद्धा स्त्री प्रतिमा रेखाटल्या. या सर्व सत्यशोधकी साहित्याशी मेळ घालणाऱ्या होत्या.

ज्याप्रमाणे कादंबरी, खंडकाव्ये, कथा, पदे, छक्कड, लावणी याद्वारे सत्यशोधकी साहित्यात स्त्री प्रतिमा मांडल्या त्याचप्रमाणे नाटकाद्वारे सुद्धा सत्यशोधकांनी विधवा केशवपन, पुर्नविवाह अशा समस्या मांडल्या आहेत.

दिनकरराव जवळकर यांच्या वांग्यातील भूत हे चार अंकी हास्यकारक नाटक आहे. या नाटकातील व्यक्तीनामे, स्थळनामे, रूपकात्मक आहेत. भोलापूर चावडीत हे नाटक घडले आहे. नाटकात पुतलाजी पाटील आणि नारबा हे मोठे अज्ञानी आहेत. भोळोपंत कुलकर्णी, बाळेम, गुरुस्वामी आणि त्याचा शिष्य नाऱ्या हे सनातनी आहेत. सखू, ठकी, सुंदरबाई या विधवा स्त्रिया आहेत. सत्यबाराव आणि यसबा हे प्रागतिक परंपरेवर आघात करणारे सत्यशोधक आहेत. या नाटकात सुंदरबाई स्वामीच्या मठात पुर्नविवाहाचे परवानगी मागते. परंतु ढोंगी स्वामी तिला आपल्या मठात सेवा करण्यासाठी राहा, असे म्हण-तात. त्याचा सुंदरा धिक्कार करते. या नाटकात तीन विधवा स्त्रियांचे लग्न पुतळाजी पाटील आपल्या दारात मांडव घालून करतात.

सत्यशोधकी साहित्यातून सुधारणावादी, परिवर्तनवादी, परंपरांना विरोष करणारी, रूढींना तोडणारी, ब्राम्हणी व्यवस्थेला त्यांचा मान्यताप्राप्त संकेतांना झुगावणारी, मनू व्यवस्थेला झिडकारणारी, विवाह ग्रथांना विरोध करणारी,स्त्रियांच्या शिक्षणाला समर्थन करणारी एकुणच पुरुषी व्यवस्थेला नाकारणारी स्त्री प्रतिमा सत्यशोधकी साहित्यात दिसून येते.

ह्या स्त्रिया वाट चुकलेल्या आहे. परंतु मानवी स्वभावानुसार त्यांनाही मन व इच्छा आहेत. त्या मारुन जगणे म्हणजे एक प्रकारची सजा आहे. ही सजा ब्राम्हणी व्यवस्थेने येथील स्त्रीला दिली आहे. त्याचाही धिक्कार येथे केला आहे. या स्त्रिया वाट चुकलेल्या असल्यातरी त्याची निंदा नालस्ती नाही.

विदर्भामध्ये सुधर्म विजय नाटक हे साग्रसंगीत तीनअंकी नाटक गोविंद नारायण फुटाणे, नायगाव (अमरावती) यंनी लिहिले. या नाटकात सगुण नावाची अनुभवाचा शहाणपणा असणारी आणि तिचा नवरा भोळा बळी ब्राम्हणाच्या गच्छमी लागणार असतो. तेव्हा ती आपल्या नवऱ्याला चिकित्सक व सत्यनिष्ठता सांगते. अशी विज्ञा-नवादी व चिकित्सक कमळा त्यांनी रेखाटली आहे.

ग्रामसंकट लीलानाटक पाच अंकी नाटक देवीदास सदाशिव पाटील यांनी पारंपरिक भोळ्या, दानधर्मी, स्त्रियांचा ब्राम्हण कसा फायदा घेतात हे रेखाटले आहे. तसेच सत्य सुबोध नाटक (तीन अंकी) पुंजाजी रामजी गोटे यांनी लिहिले. त्यांनी या नाटकाम यमू नावाची ब्राम्हण विवेकी स्त्री रेखाटली आहे. कृष्णाजी कर्फाजी चौधरी यांनी भाग्यवान सुशीला अथवा विवाहविषयक सत्यशोधकी मार्ग ही नाटिका लिहिली. त्यामध्ये व्यवहार कुशल सगुणाबाई, सु-शीलेचा ताराबाई शिंदे बाणा, सत्यशोधकी बाणा, सत्यशोधकी विवाह यामधील सगुणाबाई व सु-शीला दोन्ही स्त्रिया सुधारणावादी आहेत ही स्त्रीवादी नाटिका आहे.

विदर्भातील वामनराव घोरपडे हे सत्यशोधक परिषदांमधून सहभाग घेत होते. त्यांनी कथेच्या माध्यमातून स्त्री-पुरुष समानता सामाजिक सुधारणेचा पुरस्कार, प्रोफेसर साहेबांचे स्त्री दाक्षिण्य, संजीवनी, भाग्यवान अज्ञा-नाचे पाप, व्यवहार व देवतूत या कथेतून मांडले आहे. त्यांच्या कथा स्त्रीप्रधान होत्या. अशाचप्रकारे कथेच्या माध्यमातून मुकुंदराव पाटलांनी सुद्धा सत्यशोधकी स्त्री प्रतिम रेखाटल्या होत्या. अशाप्रकारे कथेच्या माध्यमातून स्त्री प्रतिमा रेखाटलेल्या दिसतात.

सत्यशोधकी साहित्य प्रचार व प्रसार म्हणून सातत्याने हिणवले जाते, परंतु हे साहित्य जनसामान्यांच्या भाव-भावना विशेषत: पीडित, शोषित, गुलामगिरीत हजारो वर्षापासून येथील वर्ण व्यवस्थेने ज्यांना ठेवले त्यांचा हुंकार व्यक्त करण्याचा, मांडण्याचा जोरदार प्रयत्न सत्यशोधकी साहित्याने केला आहे. ज्या समाजात स्त्रीला मान असतो तो समाज प्रगतीच्या, विकासाच्या वाटा चोखाळतो हा इतिहास आहे. उत्पादन करणारी, सर्जनशील व निर्मितीक्षम अशी स्त्री तिलाच येथील ब्राम्हणी व्यवस्थेने दडपून ठेवले. त्याचा परिणाम आजही दिसतो आहे. त्यांच्या वेदना मांडण्याचे काम सहज, सोप्या, सरळ भाषेत सत्यशोधकांनी केले. त्यासाठी त्यांनी बोलीभाषेचा लोकभाषेचा पुरस्कार केला, असे दिसते. मग तिला कुणी गावंढळ किंवा अद्याण्यांची भाषा असे म्हटले असते तरी ते अस्सल आहे. ही कुणी नाकारू शकत नाही, फक्त प्रश्न आहे तो आपली चिपळूणकरी दृष्टी बदलण्याचा आणि महात्मा फुलेंच्या दृष्टीतून पाहण्याचा एकूणच निकोप समाज रचनेसाठी सत्यशोधकी साहित्यातील स्त्री प्रतीमा अधिकच उज़ळून दिसतात, एवढे मात्र निश्चित.

बीएससी,एमए,बी.एड. जन्म: १७/०६/१९७१ सतीश माणिकराव जामोदर हे राजना (पूर्णा) ता.चांदूर बाजार जि.अमरावती येथील मुळचे रहिवासी असून ते सध्या हिवरा बु.ता.मानोरा जि.वाशिम येथील श्री गजानन महाराज विद्यालयात सहायक विज्ञान शिक्षक म्हणून कार्यरत आ-हेत. त्यांची आजकालच्या कविता, शेतकरी संघर्ष व ओबीसीच्या बावन्न कविता असे तीन काव्यसंग्रह प्रकाशित झाले आहेत. त्याशिवाय अ.भा.माळी शिक्षण परिषद करजगावातील सत्यशोधक चळवळ, वाशिम जिल्ह्यातील सत्यशोधक चळवळ, सत्यशोधकी साहित्य परिषद भूमिका,वाटचाल ही पुस्तके प्रकाशित, त्यांनी सत्यशोधक नायगावकर, बहुजन संघर्षकार नागेश चौधरी, भाग्यवान सुशीला, सत्यशोधक जलशातील फार्स, अभंग कविता विशेषांक संपादित केले आहेत.

गत २५ वर्षांपासून सत्यशोधक चळवळीत त्यांचा सक्रिय सहभाग आहे. सत्यशोधक कार्यकर्ते, पदाधिकारी, लेखक, कवी, अभ्यासक व संशोधक म्हणून ते परिचित आहेत. सत्यशोधक समाजाचे विदर्भ प्रदेश अध्यक्ष व सत्यशोधक साहित्य परिषदेच्या केंद्रीत कार्यकारिणीचे ते मजी अध्यक्ष आहेत. प्रस्तुत लेखात त्यांनी सत्यशोधकी साहित्यातील स्त्री प्रतिमा कशा रेखाटल्या गेल्या, याचा अभ्यासपूर्ण धांडोवा घेतला आहे. अभ्यासकांना तो महत्वपूर्ण ठरणार आहे.

# व्ही.पी.सिंग रिटर्न्स इन विदर्भा! मंडल यात्रेच्या निमित्ताने..

समाज मेलेला नाही, तो तसा कधीही मरत नसतो. मात्र सध्या तो झोपलेला आहे. त्याला जागवण्याची जबाबदारी आ-पली आहे, कारण आपण जिवंत आहोत!

मंडल आयोगाच्या समर्थनार्थ शिवसेनेचं नागपूर जिल्हाप्रमुख पद सोडून, माजी पंतप्रधान व्ही. पी. सिंग यांच्या ब्रह्मपुरी येथील जाहीर सभेत मी जनता दलात प्रवेश केला होता. त्याला आता तीस वर्षे झा-लीत. त्यावेळेस मला अनेकांनी वेड्यात काढलं होतं. सेना सोडली नसती तर आमदार, मंत्री झालो असतो, असं सेना भाजपाचे मंत्री देखील बोलायचे. आताही बोल-तात. त्यावेळी सेना सोडणं म्हणजे जिवावर उदार होणं, असा त्याचा अर्थ होता. 'काय झाडी, काय डोंगार, काय हाटील..!' अशी परिस्थिती त्यावेळी नव्हती. सेनेची दहशत होती. पण माझ्या बाबतीत मात्र तसं काही घडलं नाही. कारण मी सेना सोडण्याआधी शिवसेनाप्रमुखांशी मातोश्रीवर जाऊन सविस्तर चर्चा केली होती. माझी भूमिका मांडली होती. (योगायोगाने नागपूरचे कवीमित्र उल्हास मनोहर त्यावेळी माझ्यासोबत मातोश्रीवर होते. ते ह्या घटनेचे साक्षीदार आहेत.)

आज हे सारं आठवण्याचं कारण म्हणजे विदर्भातली काही तरुण मंडळी १ ऑगस्ट ते ७ ऑगस्ट अशी नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर, यवतमाळ, वर्धा या सात जिल्ह्या-तून मंडल यात्रा काढत आहेत. प्रस्थापितांची राजकीय गुलामगिरी झुगारल्याशिवाय ओबीसींची मुक्ती शक्य नाही, हे भान ओबीसींना जेवढ्या लौकर येईल, तेवढंच ओबीसीसह इतर बहुजनांचं देखिल भलं होईल. देशाचंही भलं होईल. ओबीसी, बहुजनांना मिळणारं आरक्षण जणू आपल्या बापाच्या कमाईतून दिलं जाते, असा काही भुरट्या लोकांचा भ्रम आहे. यात ओबीसी मधील काही बिनडोक लोक देखील सामील आहेत, ही संतापजनक गोष्ट आहे.

नागेश चौधरी, डॉ शंकरराव चोखारे, विजय मेटकर, अनिल धवड, प्रभाकर देशमुख, विजय बाभुळकर, नामदेव खामकर, विठ्ठलराव देशमुख, रामभाऊ अडबोल वगैरे मंडळी ही मंडल आयोगाच्या चळवळीतली त्यावेळची पहिल्या फळीतील नेतेमंडळी होती. अनिल धवड यांच्यामुळे मी त्या चळवळीत ओढला गेलो होतो.

तीस वर्षानंतर का होईना पण ओबीसी, एनटी, एसबीसी मधील काही तरुणांना त्यांचे ध्येय आणि नेमकी वाट गवसली, याचा आनंद आहे. चळवळीतील प्रामाणिक ओबीसी, बहुजन नेत्यांच्या वाट्याला आलेली टिंगलटवाळी, उपहास हा व्ही. पी. सिंग यांच्याही वाट्याला आला होता.



ओबीसी-बहुजनविरोधी टोळीने अर्थात संघ भाजपाच्या लोकांनी त्यांना व्हिलन ठरवून बदनाम केलं होतं. 'मंडल विरूद्ध कमंडल' असा संघर्ष उभा करून व्ही. पी. सिंग यांचं सरकार भाजपाच्या लोकांनी पाडलं होतं! त्या षडयंत्राचे नायक लालकृष्ण अडवाणी होते. बाजपेयी त्यात सहभागी होते.

वर्णवादी, प्रस्थापित पक्षांनी ज्या व्ही. पी. सिंगांचं राजकारण संपवण्याचा प्रयत्न केला, तोच ममंडल मसिहाफ युवा यात्रेच्या निमित्ताने पुन्हा परतून आलाय, असा मला या प्रसंगी भास होतोय! तथापि भावनात्मक न होता काही बाबी आपण याप्रसंगी समजून घेतल्या पाहिजेत!

भाजपा हा पहिल्या नंबरचा आरक्षणविरोधी पक्ष आहे. त्याची सारी धोरणे ओबीसी, बहुजन विरोधी आहेत. ओबीसींची जनगणना करण्याला त्यांनी स्पष्टपणे संसदेत नकार दिलेला आहे.

महाविकास आघाडीचं सरकार महाराष्ट्रात अडीच वर्षे होतं. ओबीसी साठी 'शेकडो होस्टेल बांधणार' अशा घोषणा ओबीसी मंर्त्यांनी केल्यात. प्रत्यक्षात किती होस्टेल बांधले आहेत? याचाही विचार होणे गरजेचे आहे.

कुणीतरी नेता येतो, वरवर समर्थन करतो, पैसे देतो, त्याच्यामुळे बातम्या छापून येतील वगैरे सारख्या गोष्टींना चळवळीतील नेत्यांनी बळी पडता कामा नये!

मकोणत्याही पक्षातून असो, पण आपला ओबीसी/आपल्या समाजाचा माणूस निवडून आला पाहिजेफ अशी भूमिका शुध्द मूर्खपणाची आहे. हा समाजविरोधी विचार आहे, याचे भान आपल्याला असले पाहिजे. समाज महत्त्वाचा नाही, नेत्यांची बांधिलकी, प्रामाणिकपणा महत्वाचा आहे!

ओबीसी युवा अधिकार मंच, संघर्ष वाहिनी आणि विविध संघटनांच्या वतीने ही यात्रा आयोजित केली आहे. त्यातील युवा नेत्यांना युवक, विद्यार्थी आणि ओबीसी, बहुजन प्रश्नांची चांगली जाण आहे. पण नवे शैक्षणिक धोरण, आरोग्य, शेती, लोकशाही, राजकारणाचे देशी तालिबानीकरण, निर्लज्ज पक्षांतरे, मीडियाचा मुर्दाडपणा, विकावू न्यायालये या ज्वलंत विषयावर देखिल युवकांनी चर्चा करायला हवी. कोणतीही चळवळ ही राजकारणाच्या शुद्धीकरणासाठी आणि लोकशाहीच्या सक्षमीकरणासाठी कामी आली पाहिजे, राजकारण्यांच्या समोर शेपटी हलविण्यासाठी नव्हे! ओबीसी मधील असंतोषाची धग मतपेटीमधून व्यक्त झाली पाहिजे. अन्यथा आपले मोर्चे, मेळावे यांना काहीही अर्थ नाही. अशा चळवळीमधूनच स्वतंत्र बाण्याचे, सामाजिक बांधिलकी असलेले अभ्यासू आणि समर्पित तरूण नेते तयार होतील, याची काळजी चळवळींनी घेतली पाहिजे.

असंख्य लोक असतील ज्यांनी मंडल चळवळीला कधीकाळी वाहून घेतलं होतं. त्यांचीही त्यावेळी टिंगल टवाळी झाली असेल. घरच्या लोकांनीही त्यांना मुर्खात काढलं असेल. पण आज ही मंडल यात्रा बघून नक्कीच त्यांचे डोळे पाणावतील! आपली मेहनत अगदीच वाया गेली नाही, याचं समाधान त्यांच्या चेहऱ्यावर असेल! आज तेही त्यांच्या पोरांना, सुनेला, बायकोला अभिमानाने त्यांचा जुना वेडेपणा सांगू शकतील. इतिहासातील त्यांच्याही जखमा काही प्रमाणात का होईना पण भरून निघतील. पुन्हा त्यांच्या काळजात व्ही. पी. सिंग नावाचं वादळ जोरात परतून आलेलं असेल.

तेव्हा, समस्त ओबीसींनो उठा! मंदिर, मशिद, पुतळे, पुरस्कार, मूर्तिपूजा, व्यक्तिपूजा यातून बाहेर या! इतिहास इतिहास करत बसू नका.. त्यातून बाहेर या! रस्त्यावर उतरून नव्या मंडल सैनिकांचे स्वागत करा! केवळ महापुरुषांच्या कहाण्या सांगण्यात, ऐकण्यात धन्यता मानू नका. त्याच त्या इतिहासात रमण्याच्या घोडचुका भविष्यात करू नका! तुम्हाला प्रिय असणारे महापुरूष आजच्या प्रसंगी कसे वागले असते, याचा विचार करा! तसे वागण्याचा प्रयत्न करा! खऱ्या अर्थानं तीच त्या महापुरुषांची अपेक्षा होती. तीच त्यांना श्रध्दांजली ठरेल!

तुम्ही साथ दिली तर या लढाईला आणखी गती येणार आहे! तुमच्याच पुढच्या पिढ्या बर्बाद होण्यापासून वाचणार आहेत, एवढं लक्षात घ्या. एक नवा इतिहास लिहिण्याची सुरुवात होत आहे, त्यात आपलेही यो-गदान असू द्या..!

मी सांगतो, अशाच थेट वागणार मुंग्या आणि हेच गीत गाऊ ला-गणार मुंग्या जुना नवा हिशेब थेट मागणार मुंग्या एकदिवस जागणार.. जागणार मुंग्या!!
पाली, साप, घोरपडी सावधान रे
सरड्यांचे नवे गडी, सावधान रे
अवती भवती दूर दूर सावधान रे
अन् घरातले फितूर सावधान रे..
आरपार शस्त्र थेट डागणार मुंग्या..
एक दिवस जागणार.. जागणार मुंग्या!!
तूर्तास एवढंच!

**ज्ञानेश वाकुडकर,** अध्यक्ष
लोकजागर ९८२२२७८९८८

# शासनाच्या नव्या धोरणानुसार पुनर्वसन-जिल्हाधिकारी

## पुजारीटोला व ढिवरटोला नागरिकांशी चर्चा:पुनर्वसनाची नागरिकांची मागणी



**गोंदिया :** गोंदिया तालुक्यातील पूर प्रवण पुजारीटोला, कासा, ब्राह्मणटोला गावातील जुन्या पुनर्वसनाच्या निकषानुसार चिन्हित ५३ कुटुंबाचे पुनर्वसन आता शासनाच्या १४ ऑक्टोबर २०२२ च्या नवीन शासन निर्णयातील तरतुदीनुसार होणार. सदर शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यासाठी जिल्हा प्रशासन पुढाकार घेणार असून यासाठी नागरिकांचे सहकार्य गरजेचे आहे. शासनाच्या नव्या पुनर्वसन धोरणाचे नागरिकांनी सुद्धा अवलोकन करावे. प्रशासन आपल्या सोबत आहे, असा विश्वास जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनी ग्रामस्थांना दिला.

जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनी पूर प्रवण गावांची भौगोलिक परिस्थिती पाहण्याकरिता गोंदिया तालुक्यातील कोरणी घाट, रजेगाव, बिरसोला, कासा, काटी, पुजारीटोला व तिरोडा तालुक्यातील कवलेवाडा, किडंगीपार, ढिवरटोला या गावांना भेट देवून स्थानिक लोकांशी संवाद साधला. यावषी करण्यात आलेले पूर परिस्थितीचे नियोजन व भौगोलिक परिस्थितीचीही त्यांनी पाहणी केली. या दौऱ्यात पुजारीटोला व ढिवरटोला येथील नागरिकांनी पुनर्वसनाबाबत जिल्हाधिकाऱ्यांना विनंती केली, त्यावेळी ते बोलत होते. कासा ग्रामपंचायत सभागृहात आयोजित बैठकीत जिल्हाधिकाऱ्यांनी पूरप्रवण क्षेत्रातील नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या. यावेळी सरपंच, उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी यांच्या समवेत तहसिलदार गोंदिया समशेर पठाण, तहसिलदार तिरोडा गजानन कोकाड्डे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी राजन चौबे, कार्यकारी अभियंता राज कुरेकर, जिल्हा माहिती अधिकारी रवी गीते, पूर नियंत्रण अधिकारी महेश भेंडारकर आणि कनिष्ठ अभियंता प्रवीण कहार प्रामुख्याने उपस्थित होते.

वैनगंगा व बाघ नदीच्या काठावर असलेली गावे व खोल-गट भागातील घरांमध्ये दरवर्षी पुराचे पाणी शिरून नुकसान होते. पुजारीटोला येथील ५३ कुटुंब व ढिवरटोला येथील कुटुंबाचे पुराचे पाणी व वैनगंगा बॅकवाटरमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. येथील कुटुंबाची योग्य पुनर्वसाची मागणी आहे.

शासनाच्या नव्या पुनर्वसन धोरणात ही कशी बसवता येईल याबाबत प्रयत्न केले जातील असे जिल्हाधिकाऱ्यांनी नागरिकांना सांगितले. हीच मागणी तिरोडा तालुक्यातील ढिवरटोला येथील ग्रामस्थांची सुद्धा आहे. १५ ऑगस्ट रोजी होणाऱ्या ग्रामसभेत शासनाच्या पुनर्वसन धोरणाचा नवा शासन निर्णय १४ ऑक्टोबर २०२२ अन्वये पूर बाधित गावातील नागरिकांना वाचून दाखविण्यात यावा अशी सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी तहसिलदार यांना केली. नव्या पुनर्वसन धोरणावर नागरिकांची मते जाणून घेतल्यानंतर पुनर्वसन प्रक्रिया करता येईल, असे ते म्हणाले.

# इमारती झाल्या खंडर,साहित्यांची चोरी

## कलपाथरी मध्यम प्रकल्पाची दैनावस्था: रस्त्यावरील चिखलामुळे अपघाताचा धोका



**गोंदिया:** गोरेगाव तालुक्यातील कलपाथरी मध्यम प्रकल्पाची देखरेखीअभावी दैनावस्था झाली आहे. या प्रकल्पातील इमारती पुर्णत: खंडर झाल्या आहेत. तर गोदामातील साहित्यांची चोरी झाली आहे. तसेच प्रकल्पाकडे जाणाऱ्या रस्त्यावर चिखलाचे साम्राज्य आहे. मात्र, याकडे लोकप्रतिनिधी व संबंधित अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष आहे.

कलपाथरी मध्यम प्रकल्पाला तयार होवून बारा वर्षाचा कालावधी लोटला आहे. यासाघी प्रशासनातर्फे कोट्यावधी रुपयांचा खर्च करण्यात आला. विविध सोयी-सुविधा पुरविण्यात आल्या. अभियंता व कर्मचाऱ्यांकरिता इमारती तयार करण्यात आल्या. मात्र, आजघडीला या इमारतीत कुणीही राहत नाही, त्यामुळे इमारती खंडर झाल्या आहेत. इमारतीतील खिडक्या, दरवाजे, फ्लोरिंग, इलेक्ट्रीक सामान पूर्णत: जर्जर झाले आहेत. तर गोदामातील टिनाचे पत्रे गायब झाले असून ती चोरीला गेल्याची माहिती स्थानिकांनी दिली. तसेच प्रकल्पाकडे जाणाऱ्या रसत्याची दुरवस्था झाली असून रस्त्यावर चिखलाचे साम्राज्य पसरले आहे.

मागील दहा वर्षात एकदाही या रस्त्याची दुरुस्ती करण्यात आली नाही. रस्त्याचे अंतर जवळपास दीड किलोमीटर आहे. या रस्त्याने घुमर्रा, तेलनखेडी, कलपात्री येथील नागरिक व विद्यार्थी ये-जा करतात. मात्र, खराब रस्त्यामुळे त्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. याकडे लोकप्रतिनिधी व संबंधित अधिकाऱ्यांनी लक्ष द्यावे, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

# मर्जीतील व्यक्तींना कंत्राट दिल्याने फेरनिविदा काढण्याची वेळ

## जि.प.स्वच्छता विभागातील प्रकार: कचरा संकलनासाठी वाहन पुरवठा



**गोंदिया:** जिल्हा परिषद पाणी पुरवठा व स्वच्छता विभागांतर्गत ओला व सुका कचरा संकलन करण्यासाठी १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून मोठ्या ग्रामपंचायतींना ई-रिक्षा देण्यात येणार होता. पण याचे कंत्राट एका जिल्हा परिषद पदाधिकाऱ्याच्या मर्जीतील आणि एका लोकप्रतिनिधीच्या मर्जीतील व्यक्तीला देण्यात आले होते. दरम्यान, यावर आक्षेप घेत होते. दरम्यान, यावर आक्षेप घेत न्यायालयात धाव घेण्याची तयारी केल्यानंतर ही निविदा आता नव्याने काढण्यात येणार असल्याची विश्वसनीय माहिती आहे.

१५ व्या वित्त आयोगातून ग्रामपंचायतींना मोठ्या प्रमाणात निधी दिला जात आहे. दरम्यान, सध्या शासनाचा सर्वाधिक भर हा स्वच्छतेवर आहे. जिल्ह्यातील मोठ्या ग्रामपंचायतींना १५ व्या वित्त आयोगाचा निधी देताना या निधीचा कशासाठी उपयोग करावा यासाठी शासनाच्या मार्गदर्शन सुचना आहेत. त्यानुसार गोंदिया जिल्ह्यातील काही मोठ्या ग्रामपंचायतींना ओला आणि सुका कचरा गोळा करण्यासाठी ई-रिक्षा वाहने देण्यात येणार होती. यासाठी निविदा मागविण्यात आली होती.

यापैकी एक निविदा जिल्हा परिषदेच्या पदाधिकाऱ्याच्या आणि एका लोकप्रतिनिधीच्या जवळील व्यक्तीला देण्यात आली होती. दरम्यान, निविदा प्रक्रियेतील एका व्यक्तीने यावर आक्षेप घेत याची तक्रार जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी व आयुक्तांकडे केली होती. तसेच या विषयाला घेऊन न्यायालयात जाण्याची तयारी केली होती. मात्र ही बाब जिल्हा परिषद मुख्य अधिकारी यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी ही निदि प्रक्रिया रद्द करुन फेरनिविदा काढण्याच्या सुचना केल्याची माहिती आहे. तर फेरनिविदा काढण्यात येणार असल्याचा वृत्ताला स्वच्छता विभागाच्या एका अधिकाऱ्याचे दुजोरा दिला आहे.

# शासन निर्णयाविरोधात जिल्ह्यात निदर्शने




**गोंदिया:** असंख्य तरुण आपले कसब पणाला लावून डी.एड.बी.एड.च्या माध्यमातून शिक्षण घेतात. या तरुणांची हक्काची संधी हिसकावून जिल्हा परिषदेच्य शाळांवर सेवानिवृत्त शिक्षकांना मानधन तत्वावर नियुक्त करण्याचा अन्यायकारक निर्णय रद्द करावा. यासाघी तसेच जुलमी शासनाच्या चुकीच्या धोरणाविषयी संविधान मैत्री संघ, युवा ग्रॅज्युएट फोरम, सर्वसमाज विचार मंच तसेच विविध सामाजिक, शैक्षणिक संघटनातर्फे एकाच दिवशी एकाच वेळी प्रत्येक तालुका मुख्यालयावर निदर्शने, आंदोलन केले. दरम्यान, प्राधिकृत अधिकाऱ्यांमार्फत शासनाला निवेदन दिले.

निवेदनातून सेवानिवृत्त शिक्षक कर्मचाऱ्यांच्या जिल्हा परिषद शाळेत कंत्राटी नेमणुका करण्यात येऊ नये, पवित्र पोर्टलवर नोंदनी प्रक्रिया तत्काळ सुरु करावी, रिक्त पदांच्या ८० टक्के (५५ हजार) शिक्षक पदभरती करण्यात यावी, विभागीय भरती नियमित गुणवत्ता यादी लावण्याचा शासनाच्या विचाराधीन असल्यास तो निर्णय रद्द करावा, केंद्रीय पद्धतीने गुणवत्ता यादी लावण्यात यावी, प्रतीक्षा यादी लावण्यात यावी, सर्वच प्रवर्गाचे अनुशेष भरुन काढावे आणि त्या प्रवर्गातील जागा अतिरिक्त असतील त्यांचा प्रश्न तातडीने सोडवावा, अशी मागणी केली. गोंदिया जिल्हा मुख्यालय येथे प्रशासकीय भवन डॉ. आंबेडकर चौक परिसरात भव्य निदर्शने करण्यात आले. तसेच जिल्हाधिकारी गोतमारे यांच्यामार्फत शासनान निवेदन देण्यात आले. यावेळी अतुल सतदेवे, उमेश कटरे, वसंत गवळी, सुनील भोंगाडे, रवी भांडारकर, उमेश दमाहे, नितेश उदापुरे, हितेश सिंगनजुडे, मुकुंद परिहार, निहाल बिसेन, रश्मी येनससुरे, हंसा बावणकर, आकाश कोल्हे, भेजेंद्र तुरकर, रमा चुटे, मृणाली खांडेकर, तनुजा शेंडे, हीना बोबचगल लता पारधी, रविकांता बिसेन, पंचशीला पानरवणे, शोभा ठाकरे, पंकज ठाकरे, छत्रपाल रहांगडाले, निलेश बच्छेरे, मनीष चावके, नईम शेख, भुपेंद्रकुमार सुर्यवंशी, उमेश पटले, नंदकिशोर पटले, महेशकुमार फुंडे, मुकेश आंबाडारे, विजय पारधी, विनय हिरकने, चित्रसेन गौतम उपस्थित होते. त्याचप्रमाणे इतर तालुका मुख्यालयावर निदर्शने करुन तहसीलदारांमार्फत निवेदन दिले. आमगाव येथे मुकेश उजवने, खेमराज उईके, नरेंद्र मेश्राम, मुकेश डोंगरे, अमोल राऊत, देवरी येथे राकेश टेंभुर्णीकर, उत्तम बोंबार्डे, मिलींद गणवीर, अतुल डोंगरे, संदीप गोंडाणे, सतीश रंगारी, अमोल पंचभाई, श्वेता पाचे, अर्जुनी मोरगाव येथे अशोक खोब्रागडे, प्रमोद नेवारे, दिलबर रामटेके, विनोद रोकडे, दिलीप मेश्राम, जितेंद्र मेश्राम, राजू मेश्राम, बाळू दुपारे, सुरेश जांभुळकर, बादल राऊत, डी.टी. बांबोले, पदमाकर बोरकर, शैलेश तागडे, गोरेगाव येथे प्रा. सचिनकुमार नांदगाये, रमेश सिलेवार, पंकज मेश्राम, मयुर वालदे, अजय वालदे, धर्मराज काळसर्पे, सतीश तांडेकर, पुरुषोत्तम रहांगडाले, लोकचंद तिलकचंद पटले, डोमेन फुकटकर, मोहनलाल बोपचे, नरेंद्र गजभिये, ओमेश ठाकुर, नरेश बोरकर, तुषार डोंगरे, आदर्श शहारे, नुपेंद्र चौधरी, सालेकसा येथे मनोज डोये, राहुल हटवार, राकेश रोकडे, उमंग बन्सोड आदि उपस्थित होते.

# आर्थिक चणचणीतून केली निरजकुमारने आत्महत्या



**गोंदिया:** गांजा, क्रिकेट सट्टा यांचा लागलेला नाद, त्यातून मित्र मंडळीकडून घेतलेली हात उसनवारी तसेच सतत असलेली आर्थिक चणचण यातून आलेल्या नैराश्यातून तरुणाचे गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना शुक्रवार (दि.२८) गोंदिया येथे घडली. नीरजकुमार मानकानी (वय २४) रा. श्रीनगर गोंदिया) असे आत्महत्या करणाऱ्या तरुणाचे नाव आहे.

नीरजकुमार मोबाईल विकून पैसे कमवायचा. गोदिया व नागपूरातून मोबाईल कमी किमतीत बोलावून तो मित्रांना व इतर लोकांना विक्री करायचा. यावरच त्याचा उदरनिर्वाह चालत होता. नीररकुमारच्या वडीलांचे ११ वर्षापुर्वी निधन झाल्याने तो आईसोबर गोंदियात राहायचा. त्याने मित्रमंडळीकडून हात उसनवारीवर दोन लाख ते अडीच लाख रुपये घेतल्याची चर्चा आहे. त्याला ऑनलाईन गेमींगची सवय होती. परंतु त्याच्याकडे फारसे पैसे नसल्याने त्याने या खेळात जास्त पैसे गुंतवले नाहीत. तो स्वत: सात हजार रुपये महिन्याने गोंदियातील एका ट्रेडर्समध्ये नोकरीला होता. २८ जुलै रोजी नीरजकुमारची आई विदर्भ एक्प्रेसने नागपुरला निघाली. आईचा निरोप घेतल्यानंतर घरी आल्यानंतर नीरजकुमारने स्वत:च्या घरात गळफास घेतला. या घटनेसंदर्भात गोंदिया शहर पोलिसांनी आकस्मिक मृत्युची नोंद केली आहे. ठाणेदार चंद्रकांत सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनात सहायक पोलीस निरीक्षक सागर पाटील तपास करीत आहेत.

### बुकींवर कारवाई केव्हा करणार?

गोंदिया शहर आणि जिल्ह्यात ऑनलाईन गेमिंग आणि सट्टा व्यवसाय जोरात सुरु अहे. यातून बुकी गर्भश्रींमत होत असले तरी युवा पिढी आणि अल्पवीन मुलांचे आयुष्य मात्र खराब होत अहे. तर सट्टा किंग सोंटू जैन याच्यावरील कारवाईनंतर गोंदियात किती मोठ्या प्रमाणात सट्टा चालतो हे देखील स्पष्ट झाले आहे. त्यामुळे युवक आणि अल्पवयीन मुलांचे आयुष खाब करणाऱ्या या बुकींवर कारवाई केव्हा होणार असा सवाल शहरावासीयांकडून उपस्थित केला जात आहे.

# विना परवाना खत विक्री करणाऱ्या दोन व्यक्तीवर गुन्हा दाखल

## भरारी पथकाची कार्यवाही : १.९३ लाखांचा खत जप्त



**गोंदिया :** गोरेगाव तालुक्याल मुंडीपार व हेटी (पालेवाडा) येथे विना परवाना खत विक्री करीत असल्याची गोपनीय माहिती कृषी विभागाच्या भरारी पथकाला मिळाली. त्या माहितीच्या आधारावर कृषी वभागाच्या भरारी पथकाने टेकराम कटरे, मुंडीपार येथे घाडीत ८० बॅग भू-वर्धन ऑरग्यानिक खत रक्कम १ लाख ३ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्ती केला. तसेच मंगरु मेश्राम हेटी (पालेवाडा) येथून ७० बॅग भू-वर्धन ऑरग्यानिक खत रक्कम ९० हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. असे एकुण १ लाख ९३ हजार ५०० रुपयांचा माल जप्त करण्यात आले. ही कार्यवाही २८ जुलै २०२३ रोजी करण्यात आली असुन विना परवाना खत विक्री करणारे टेकराम कटरे व मंगरु मेश्राम यांच्याविरुध्द गोरेगाव पोलिस स्टेशन येथे खत नियंत्रण आदेश १९८५ कलम ७, अत्यावश्यक वस्तु अधिनियम १९५५ कलम ३(२)(र), ३(२)(व), ७ व भारतीय दंड संहिता १८६० कलम ४२०, ३४ नुसार अपराध क्रमांक ०४३० दिनांक २९ जुलै २०२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

ही कार्यवाही विभागीय कृषी सहसंचालक राजेंद्र साबळे, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी हिंदुराव चव्हाण, कृषी विकास अधिकारी महेंद्र मडामे, तंत्र अधिकारी चंद्रशेखर कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली राजेश रामटेके कृषी अधिकारी, पंचायत समिती, गोरेगाव यांच्या फिर्यादीवरुन करण्यात आली. सदर कार्यवाहीमध्ये जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक यसलव बावनकर, जि.प. जिल्हा कृषी अधिकारी (विघयो) पी.डी. कुर्वे, अतुल येडे कृषी अधिकारी पंचायत समिती, गोंदिया यांनी सहकार्य केले.

जिल्हयातील शेतकऱ्यांनी अधिकृत व परवानाधारक विक्रेत्यांकडूनच बियाणे, खते व किटकनाशके खरेदी करावे व त्याचे पक्के बिल विक्रेत्यांकडून घ्यावे. जिल्ह्यात कोणीही अनाधिकृत अथवा विना परवाना असलेले बियाणे, खते व किटकनाशके विक्री करु नये अन्यथा संबंधितांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी हिंदुराव चव्हाण यांनी केले आहे.

## दोषी आढळल्याने ग्रामसेवक बघेले निलंबित

**गोंदिया:** ब्तलुक्यातील ईरी ग्राम पंचायतीचे तत्कालीन ग्रामसेवक नरेश बघेले यांनी मोठ्या प्रमाणात कामात अनियमीतता केली. त्यांच्या चुकीमुळे परिचराला आत्महत्या करावी लागली. तर तत्कालीन पदाधिकाऱ्यांवर कारवाई झाली. या सर्व प्रकरणांत १२ मुद्दे असलेली तक्रार जि.प. सदस्य लक्ष्मी तरोने यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे केली. त्यातील ८ मुद्द्यांत सत्यता आढळ ल्यामुळे १९ जुलै रोजी ग्रामसेवक नरेश बघेले यांना निलंबित करण्यात आले.



गोंदिया तालुक्यातील इर्री येथील तत्कालीन ग्रामसेवक नरेश बघेले याच्या अनागोंदी कारभाराला पदाधिकारी आणि कर्मचारी देखील त्रासले होते. ग्रामसेवकाची वारंवार तक्रार देखील करण्यात आली होती. मात्र त्याकडे पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेने दुर्लक्ष केले. परिणामी ग्रामसेवक बघेले याचे मनोबल उंचावले होते. अशातच परिचराने आत्महत्या केली. ग्रामसेवकाच्या दुर्लक्षामुळे तत्कालीन प्रभारी सरपंचांना तुरुंगात देखील जावे लागले होते. या ग्राम सेवकाची तक्रार जिल्हा परिषद सदस्य लक्ष्मी तरोणे यांनी २ मे रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे केली होती. कामात अनियमितता, भ्रष्टाचार, शौचालयाचे अनुदान लाभार्थींना न देणे अशा विविध १२ मुद्द्यांचा त्यात समावेश होता. तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली. त्यातील ८ मुद्द्यांत दोषी आढळल्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी १९ जुलै रोजी आदेश काढत ग्रामसेवक नरेश बघेले याला निलंबित केले.

# बार्टीमार्फत आयोजित यूपीएससी पूर्वतयारी

**मुंबई :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे मार्फत दिल्ली येथील नामांकित प्रशिक्षण संस्थांमध्ये राज्यातील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी संघ लोकसेवा आयोग-नागरी सेवा परीक्षेसाठी निः शुल्क अनिवासी प्रशिक्षण (कोचिंग) राबविण्यात येणार आहे. त्याकरिता १४ ऑगस्टपर्यंत अर्ज मागविण्यात येत आहे.

२७ ऑगस्ट २०२३ रोजी सामायिक प्रवेश परीक्षा (सीईटी) आयोजित करण्यात आली असून इच्छुक पात्र उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी www.siac.org.in या संकेतस्थळास भेट द्यावी, असे आवाहन बार्टीचे महासंचालक सुनील वारे यांनी केले आहे.

राज्यातील अनुसूचित जातीतील ३०० उमेदवारांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे माफ 'त दिल्ली येथील प्रशिक्षण संस्थेमध्ये संघ लोकसेवा आयोग-नागरी सेवा परीक्षेच्या ( पूर्व व मुख्य) पूर्वतयारी प्रशिक्षणासाठी पुरस्कृत (Sponsor) करण्यात येणार आहे.

युपीएससी परीक्षेच्या पूर्व तयारी प्रशिक्षणासाठी दिल्लीतील केंद्रासाठी अनुसूचित जातीच्या ३०० उमेदवारांची निवड करण्यात येईल. त्यामध्ये ३० टक्के जागा महिलांसाठी, ४ टक्के जागा दिव्यांग व्यक्तीसाठी (Person With Disability), ५ टक्के जागा अनुसूचित जाती अंतर्गत वंचित जातीमधील (वाल्मिकी व तत्सम जाती- होलार, बेरड, मातंग, मांग, मादगी इ.) विद्यार्थ्यांकरिता आरक्षित असतील, एकूण जागांच्या ५% जागा विशेष बाब म्हणून राखीव ठेवण्यात येतील.

उमेदवार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा, उमेदवाराकडे महाराष्ट्रातील अनुसूचित जातीचा दाखला व अधिवास असावा, उमेदवार कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा, उमेदवाराचे वय संघ लोकसेवा आयोग-नागरी सेवा परीक्षेच्या अटी व शर्ती नुसार असावे,

संघ लोकसेवा आयोगामार्फत सन २०२४ मध्ये घेण्यात येणा?्या नागरी सेवा परीक्षेसाठी पात्र असावा, रुपये ८ लाखापर्यंत कौटुंबिक उत्पन्न मर्यादा असलेले उमेदवार प्रशिक्षणासाठी पात्र असतील. बार्टी संस्थेमार्फत दिल्ली येथील प्रशिक्षण संस्थेचे प्रशिक्षण शुल्क देण्यात येते, हे प्रशिक्षण अनिवासी असल्याने उमेदवारांना दिल्ली येथील निवास व भोजनाची व्यवस्थेकरिता प्रती माह कमाल रक्कम १३ हजार रुपये विद्यावेतन देण्यात येते. विद्यावेतन करिता विद्यार्थ्यांची उपस्थिती ग्राह्य धरण्यात येईल, प्रशिक्षणाच्या सुरवातीस दिल्ली येथे जाण्याकरिता पाच हजार रुपये (एकदा) व प्रशिक्षण संपल्यानंतर परतीच्या प्रवासाकरिता पाच हजार रुपये (एकदा) प्रवास खर्च देण्यात येतो, पहिल्या महिन्यातील आर्थिक सहाय्य तीन हजार रुपये (एकरकमी) देण्यात येते, अशी माहिती महासंचालक श्री. वारे यांनी दिली.

# राजकीय खिचडीमुळे जिल्ह्यात सर्वच परेशान

## मतदारसंघावर प्रत्येकाकडून दावा: उमेदवारी कुणाला मिळणार कुणाची चुप्पी, तर कुणाचे वेट अॅड वॉच

**गोंदिया:** महाराष्ट्राच्या राजकारणात या पंचवार्षिकमध्ये ऐतिहासीक घडामोडी झाल्या आहेत. त्यामुळे कुणाची सत्ता, ताळमेळ जुळेनासा झाला. आता तर राष्ट्रवादीचाही एक गट सत्तापक्षात असल्याने राज्यभरात राजकीय खिचडीच झाली आहे. त्यामुळे महाविकास आघाडी असो वा भाजपच्या युतीतील मित्रपक्ष, आगामी विधानसभा आणि लोकसभेत कुणाला उमेदवारी मिळणार? याचीच सर्वांना चिंता लागली आहे.



जिल्ह्यात चार विधानसभा क्षेत्र असून, आतापर्यंत काँग्रेस-राष्ट्रवादी विरोधात भाजप अशीक थेट लढत राहिली आहे. आता शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन गट झाले. यातील एक गट महाविकास आघाडीसोबत, तर दुसरा गट भाजप महायुतीसोबत आहे. यावरुन आता आगामी लोकसभा आणि विधानसभेची उमेदवारी देताना कुण्या एका पक्षाला माघाव घ्यावी लागेल, तर कुणाला संधी द्यावी लागेल. यातून कुणी दुखावले जाण्याची दाट शक्यता असल्याने पक्षश्रेष्ठींचा चांगलाच कस लागणार आहे. राज्यातील या नवीन समीकरणामुळे जिल्ह्यातील सर्वच पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते सुद्धा संभ्रमात आहेत.

### सध्याची राजकीय स्थिती

**लोकसभा:-** भडारा-गोंदिया लोकसभा मतदारसंघात एकुण सात विधानसभा मतदारसंघाचा समावेश आहे. यापैकी चार गोंदिया जिल्ह्यात, तर तीन विधानसभा मतदारसंघ भंडारा जिल्ह्यात आहेत. सध्या या लोकसभा मतदारसंघात भाजपचे खासदार सुनील मेंढे आहेत. सन २०१९ च्या निवडणुकीत या ठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष दुसऱ्या क्रमांकावर होता.

### विधानसभा मतदारसंघातील राजकीय स्थिती

**गोंदिया**-या मतदारसंघात अपक्ष आमदार असून सन २०१९ च्या निवडणुकीत भाजपचा उमेदवार दुसऱ्या स्थानावर होता.

**तिरोडा**-या मतदासंघात भाजपचा आमदार असून सन २०१९ च्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचा उमेदवार दुसऱ्या स्थानी होता.

**अर्जुनी मोरगाव**-या मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेसचा आमदार असून सन २०१९ च्या निवडणुकीत भाजपचा उमेदवार दुसऱ्या स्थानी होता.

**देवरी**- या मतदारसंघात काँग्रेसचा आमदार असून, सन २०१९ च्या निवडणुकीत भाजपचा उमेदवार हा दुसऱ्या क्रमांकावर होता.

### नेते काय म्हणतात (महाविकास आघाडी)

**भंडारा-गोंदिया लोकसभा मतदारसंघाची उमेदवारी ही आतापर्यंत राष्ट्रवादी काँग्रेसकडे होती. त्यामुळे या निवडणुकीत महाविकास आघाडीचे नेते यासंदर्भात काय भूमिका घेतात आणि काँग्रेस श्रेष्ठी काय आदेश देतात त्यानुसार कार्य करु.**

**दिलीप बन्सोड,** जिल्हाध्यक्ष काँग्रेस

**महाविकास आघाडीतील पक्षप्रमुखांचा निर्णय आम्हाला मान्य असणार आहे. पक्षप्रमुख उध्दव ठाकरे जो आदेश देतील, त्या आदेशानुसार आम्ही निवडणुकीत काम करु.**

**पंकज यादव,** जिल्हाप्रमुख शिवसेना (ठाकरे गट)

### भाजप मित्र पक्ष

**जिल्ह्यात लोकसभा आणि चारही मतदारसंघात भाजपचा उमेदवार राहिला आहे. जिल्ह्यात भाजपच्या कार्यकर्त्यांची मोठी फळी आहे. पण आगामी काळात पक्षाचे वरिष्ठ नेते जो आदेश देतील, त्यानुसार ाम करु, आताच त्यावर काही सांगता येणार नाही.**

**केशवराव मानकर,** जिल्हाध्यक्ष भाजप

**भारतीय जनता पक्षासह युती असल्याने व पक्ष प्रमुख एकनाश शिंदे जे निर्णय घेऊन आदेश देतील, त्यानुसार काम करण्याची आमची भूमिका राहील.**

**मुकेश शिवहरे,** शिवसेना जिल्हा प्रमुख (शिंदे गट)

**विदर्भात राष्ट्रवादी काँग्रेसकडून तीन लोकसभेच्या जागा लढविल्या जाणार आहेत. लोकसभा आणि विधानसभेत जास्तीत-जास्त जागा निवडून कशा आणता येईल पक्षाचा विस्तार कसा करता येईल यासाठी मोर्चेबांधणी सुरु आहे.**

**गंगाधर परशुरामकर,** जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)


## महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, गोंदिया

### ई-निविदा सुचना क्र.२१ सन २०२३-२०२४ (प्रथम मागणी)

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग कार्यालय गोंदिया, उपविभाग क्र.१,२,३ गोंदिया, साकोली, भंडारा येथे ग्रीष्म कालीन कालावधीकरिता कुलरची रिपरिंग, ओव्हरऑईलिंग व नवीव कुलरचा पुरवठा करण्याच्या कामाची निविदा मजीप्रा कडून मागविण्यात येत आहे. कामाची अंदाजित किंमत रू.१,१५,२९२/- आहे. सदर निविदेचा सविस्तर तपशील दिनांक ०२/०८/२०२३ ते दि. ०९.०८.२०२३ पर्यंत विभागीय कार्यालयामध्ये उपलब्ध आहे.

**कार्यकारी अभियंता**
**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण**
**विभाग, गोंदिया**

# संविधान चौकातून जय ओबीसीच्या गजरात निघाली मंडल यात्रा




## विदर्भातील सात जिल्ह्यात फिरणार, चंद्रपूरला रविवारला होणार समारोप



**नागपूर:** ओबीसी, व्हीजेएनटी आणि एसबीसी विद्यार्थ्यांना "मंडल आयोगाबाबत जागृती करीत त्यांना त्यांचे अधिकार आणि हक्क समजावून सांगण्यासाठी मंडल दिनानिमित्त विदर्भातील सात जिल्ह्यात काढण्यात आलेल्या मंडल यात्रेला १ ऑंगस्टरोजी नागपूरातील सविंधान चौकातून शुभारंभ करण्यात आले. या मंडल यात्रेला सविंधान चौकात नागेश चौधरी, बबन तायवाडे, रमेश पिसे संजय शेंडे, शुषमा भड, डॉ अंजली साळवे, भाग्यश्री ठाकरे, रंजना सुरजुसे, प्रकास डायरे, प्रभु राजगडकर, राजेन्द्र बढ़िये, आनंद मंजरखेडे, प्रेम राठोड, गजेंद्र चाचरकर, प्रभाकर मांढरे, मुकुंद आदेवर आदीनी हिरवी झेंडी दाखवून रवाना केली. यावेळी, सदाशिव हिवलेकर, प्रभाकर मांडरे, प्रदिप गायकवाड, राष्ट्रीय पोवार क्षत्रिय महासभेचे उपाध्यक्ष मोतीलाल चौधरी, कृष्णाजी बेले, वंदना वनकर, सामाजिक कार्यकर्ते मनोज चव्हाण, धिरज भिसीकर, संजु भुरे आदी मान्यवर उपस्थित होते.

संविधान चौकातील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करुन कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली. मंडल यात्रेच्या शुभारंभप्रसंगी उपस्थित लोकप्रतिनिधीनी ओबीसींच्या जनजागृतीसाठी काढण्यात आलेल्या यात्रेला शुभेच्छा देत ओबीसी जनगणनेसाठी सर्वांनीच आपली शक्ती पणाला लावण्याची गरज असल्याचे विचार व्यक्त केले.तसेच या मंडल यात्रेच्या माध्यमातून ओबीसी, व्हीजेएनटी, एसबीसी युवकांना विविध योजनांची माहिती मिळणार असल्याबद्दल आयोजकांचे आभार मानले.

या मंडल यात्रेसोबत यात्रेचे आयोजक ओबीसी युवा अधिकार मंचचे सर्योजक उमेश कोरीम, संघर्ष वाहिनीचे दिनानाथ वाघमारे,प्रा अनिल डहाके, मुकुंद आडेवार, वंदना वनकर, धिरज भिसीकर, संजु भुरे, रमेश पिसे आदी मान्यवर आहेत.

ओबीसी व्हीजेएनटी, एसबीसी समाजातील विविध प्रश्न आणि त्यावरील उपायावर चर्चा, विद्यार्थी, युवक, अधिकारी, कर्मचारी यांच्यामध्ये जागृती, ओबीसींचे वसतिगृह, महाज्योती आणि ओबीसी आर्थिक विकास महामंळाच्या योजना, शिष्यवृत्तीचा लाभ, ओबीसींची जनगणना तसेच यात्रेच्या माध्यमातून ओबीसी हितासाठी गठित बी.पी. मंडल आयोगाच्या शिफारशींची माहिती ओबीसी समाजाला देऊन या शिफारशी शासनाने लागू करण्याची आवश्यकता या विषयावर जनजागृती करण्यात येणार आहे.

या यात्रेच्या यशस्वीतेसाठी ओबीसी युवा अधिकार मंच, ओबीसी अधिकार मंच, संघर्ष वाहिनी, ओबीसी संघर्ष कृती समिती, ओबीसी सेवा संघ,संविधान मंच, स्टुडटंस राईटस असो. सेल्परिसपेक्ट मुव्हमेंट, भोयर पवार महासंघ, सर्व समाज ओबीसी मंच, ओबीसी अधिकारी कर्मचारी महासंघ, ओबीसी विद्यार्थी संघटना, भटके विमुक्त परिषद, आता लढूया एकीनेच सारख्या अन्य बहुजन ओबीसी संघटनां प्रयत्न करीत आहेत.

# केंद्राचे संशोधन केवळ कागदावरच

**गोंदिया:** आमगाव नजीक असलेल्या माल्ही येथे १३.३० हेक्टर जागेत डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ आणि कृषी विभागाचे कृषी संशोधन केंद्र आहे. अगदी मोक्याच्या जागेवर या दोन्ही विभागाचे कार्यालय व जमीन आहे. मात्र, संशोधन केवळ कागदोपत्री होत आहे. शेतकऱ्यांना मार्गदर्शन, नव्या संशोधनाची जवाबदारी या विभागाची आहे. मात्र असलेल्या जागेतच लागवड खर्च निघेल इतकेही उत्पन्न होत नाही. त्यामुळे शासनाचा या विभागांवरचा खर्च निरर्थक ठरत आहे. त्यामुळे संशोधन केवळ कागदावरच असल्याचे दिसत आहे.

आमगाव ते लांजी मार्गावर वाघनदीच्या अगदी तीरावर डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ आणि कृषी विभाग यांचे संशोधन केंद्र आहे. या दोन्ही विभागांची कार्यालये वेगवेगळी आहेत. पंजाबराव देशमुख कृषी संशोधन केंद्राची देखभाल संशोधन केंद्राच्या अधिकाऱ्यांकडे आहे. तर कृषी विभागाचे शासकीय संशोधन केंद्र कृषी विभागाकडून हाताळण्यात येते. याठिकाणी दोन्ही विभागांना संश्रोधनासाठी १३.३० हेक्टर जागा दिली आहे. गेल्या आठ ते दहा वर्षापुर्वी हे संशोधन केंद्र नावारुपाला आले होते. या कार्यालयाची भव्यता सर्वांनीच अनुभवली. संशोधनाचे उत्तम कार्य येथून सुरु होते. मात्र, त्यानंतर शासनाकडून संशोधन केंद्राकडे दुर्लक्ष केल्याने आता संशोधन केंद्राचा परिसर अडगळीत पडला आहे. संशोधन केंद्राच्या मुख्य प्रवेशद्वारातून प्रवेश केल्यास गुडघाभर गवत वाढलेल्या रस्त्यावरुन आत जावे लागते. त्या गवतातून कधी एखादा साप समोर येईल याची शास्वती नाही. नावालाच संशोधन केंद्र आहे. शेतकऱ्यांची रोवणी जोमात सुरु आहे.

मात्र येथील पऱ्हे अत्यंत निकृष्ठ असून रोवणीयोग्य नाही. त्यामुळे केंद्र नेमके संशोधन कशाचे करते, हेच समजण्यापलिकडे आहे. एकेकाळी वैभव अनुभवलेल्या विभामगृहाला गळती लागली. मोठी मालमत्ता असतानाही शासन दुर्लक्ष का करत आहे हे कळण्यापलिकडचे आहे.



### रविवारी कार्यालय कर्मचाऱ्यांविना

**कृषी विभागाच्या संशोधन केंद्रात दोन कृषी पर्यवेक्षक आणि दोन शिपायांची पदे मंजूर आहेत. कृषी पर्यवेक्षकांची दोन्ही पदे भरण्यात आली आहे. त्यातील एक कर्मचारी गोंदिया कार्यालयात अतिरिक्त कार्यभार सांभाळत आहेत. शिपायाचे एक पद रिक्त आहे. एकच असलेल्या शिपायाला रविवारी सुटी असते. त्यामुळे रविवारी हे केंद्र कर्मचाऱ्यांविना असते.**

### रिक्त पदांचाही त्रास

**पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठांतर्गत संशोधन केंद्राकडे ३.३० हेक्टर जागा आहे. त्यापैकी १.१० हेक्टर जागा बांधकामासाठी राखीव आहे. या संस्थेकडे बियाणे तयार करुन ते शेतकऱ्यांना विक्री करणे आणि उरलेले बियाणे शसकीय केंद्रावर विक्री करणे असे काम आहे. मात्र, पेरणीच होत नसल्याने शेतकऱ्यांना काय बियाणे उपलब्ध करुन देणार, अशी स्थिती आहे. या कार्यालयात एकुण सात पदे मंजूर आहेत. त्यापैकी फक्त तीन पदे भरली असून त्यात कृषी सहाय्यक, वरिष्ठ संशोधन सहाय्यक आणि मजूर यांचा समावेश आहे.**

### असे बियाणे घेणार कोण?

**संशोधन केंद्राकडे १० हेक्टर जागा असून ६ हेक्टर लागवडीखाली आणि ४ एकर पडीत आहे. या केंद्रामार्फत महाबिज कंपनीसाठी बियाणे तयार करण्याचे काम आहे. या कार्यालयात एक कृषी पर्यवेक्षक आणि एक चौकीदार कार्यरत आहे. बियाणे तयार करण्यासाठी शासनाकडून पैसा देण्यात येते. मात्र, येथील धानाची स्थिती बघून असे धान घेणार तरी कोण, असाच प्रश्न पडतो. यासंदर्भात उपविभागीय कृषी अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता होऊ शकला नाही.**

## विदर्भात मंडल यात्रेचे छायाकिंत स्वागत











# भिंडेच्या व्यक्तव्याचा नोंदविला निषेध

**गोंदिया:** राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्याबद्दल मनोहर उर्फ संभाजी भिडे यांनी केलेल्या अवमानकारक वक्तव्याच्या विरोधात येथील जिल्हा कॉंग्रेस कमिटीने सोमवारी (दि.३१) गांधी प्रतिमा चौकात निषेध आंदोलन केले.

बडनेरा येथील कार्यक्रमात भिडे यांनी महात्मा गांधी व त्यांच्या कुटुंबियांबद्दल अवमानकारक वक्तव्य केले होते. यामुळे सध्या राज्यभरात कॉंग्रेस पक्षाकडून तीव्र आंदोलन छेडण्यात आले आहे. यातूनच कॉंग्रेस सेवादलच्यावतीने सोमवारी (दि.२७) गांधी प्रतिमा चौकातच भिडे यांच्या छायाचित्राला जोडो मारा आंदोलन करण्यात आले होते. त्यानंतर सोमवारी (दि.३१) जिल्हा कॉंग्रेस कमिटीकडून तीव्र निषेध आंदोलन करण्यात आले.

याप्रसंगी कॉंग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष दिलीप बन्सोड, प्रदेश सचिव अमर वराडे, महिला जिल्हाध्यक्ष वंदना काळे, जहीर अहमद, अशोक गुप्ता यांच्यासह अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येत उपस्थित होते. त्याकरिता जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे पदाधिकारी, तालुकाध्यक्ष, शहराध्यक्ष, सेल विभाग, फ्रंटल व महिला कमिटीचे अध्यक्ष तसेच जि.प.सदस्य, पं.स.सदस्य, सहकार क्षेत्राचे सदस्य व पक्षाचे कार्यकर्ते उपस्थित होते.



# कोतवाल भरती परीक्षा झाली रद्द



**अर्जुनी मोरगाव:** कोतवाल भरती प्रक्रियेत सावळागोंधळ झाल्याचा परीक्षार्थीनी आरोप केला होता. सोमवाररी (दि.३१) दुपारी उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरु केले होते. अखेर उपविभागीय अधिकारी वरुणकुमार सहारे यांनी ही लेखी परीक्षा रद्द केली आहे. नव्याने पुन्हा परीक्षा घेतली जाणार आहे. परीक्षेसंदर्भात झालेल्या घोळाची चौकशी केली जाणार असल्याची माहिती त्यांनी पत्रकारांना दिली.

अर्जुनी मोरगाव उपविभागात १७ जागांसाठी ४७७ उमेदवारांनी कोतवाल पदासाठी आवेदन केले. यात अर्जुनी मोरगाव १३ व सडक अर्जुनी तालुक्यातील ४ रिक्त जागांचा समावेश आहे. यासाठी अर्जुनी मोरगाव येथील दोन परीक्षा केंद्रावर रविवारी लेखी परीक्षा घेण्यात आली. परीक्षेची निर्धारित वेळ साडे अकरा वाजता होती. मात्र पेपर अर्धा तास विलंबाने सुरु करण्यात आला. परीक्षार्थींनी अर्धा तासापुर्वी कक्षात हजर राहण्याची सुचना असतानाही उशिरा हजर झालेल्यांना प्रवेश देण्यात आला. परीक्षार्थीकडून परीक्षा शुल्क घेण्यात आले. मात्र त्यातुलनेत परीक्षा केंद्रावर सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या नाही.

सरस्वती विद्यालयात पुरेशी बैठक व्यवस्था असून सीसीटीव्ही कॅमेरे बसवले आहेत. या परीक्षा केंद्रावर सडक अर्जुनी तालुक्यातील ८३ परीक्षार्थी बसविण्यात आले. जिल्हा परिषद हायस्कूल येथे सीसीटीव्ही कॅमेरे नाहीत.

या केंद्रावर ३९४ परीक्षार्थी बसविण्यात आले. संपूर्ण परीक्षार्थीची परीक्षा सरस्वती विद्यालयात घ्यायला पाहिजे होती अन्यथा जि.प. हायस्कूल येथे तात्पुरते सीसीटीव्ही कॅमेरे बसवायला पाहिजे होते. जि.प. हायस्कूल केंद्रावर खोली क्र.९ मध्ये एका परीक्षार्थीकडून कॉपी हस्तगत करण्यात आली. ही कॉपी हस्तगत केल्यानंतर त्यावर आजूबाजूच्या दोन परीक्षार्थीच्या स्वाक्षरी घेऊन ती उत्तरपत्रिकेला जोडून ठेवणे अपेक्षित होते. शिवाय त्या परीक्षार्थीकडून उत्तरपत्रिका स्वीकारुन त्याला कक्षाबाहेर पाठवायला पाहिजे होते. हा नियम पाळल्या गेला नाही.

### ती कॉपी नेमकी आली कुठून

**परीक्षार्थीकडून हस्तगत केलेली कॉपी गायब आहे. कॉपी पकडल्यावर नियमानुसार ती उत्तरपत्रिकेसोबत जोडलेली असायला पाहिजे होती. त्यावर त्या परीक्षा खोलीतील इतर दोन परीक्षार्थींच्या सह्या घेणे अपेक्षित होते. तो नियम पाळण्यात आला आहे. परीक्षाखोलीच्या खिडकीबाहेर ३७ उत्तरे सोडविलेली कॉपी इतर परीक्षार्थींना सापडल्याची ओरड होती. ती हीच कॉपी असल्याचे म्हटले जाते. मात्र तपासात त्या खिडकीबाहेर जायला जागाच नाही. सर्वत्र झाडेझुडपे आहेत. मग तक्रारकर्त्यांनी तो शोधून काढली कशी? हा प्रश्न उपस्थित केला जात आहे.**

### उमेदवारांचे उपोषण

**सोमवारी १५ परीक्षार्थींनी उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरु केले होते. या उपोषणाला शिवसेना ठाकरे गटाचे) जिल्हाप्रमुख शैलेश जायस्वाल यांनी पाठिंबा दिला होता. उपविभागीय अधिकारी वरुणकुमार सहारे यांनी उपोषणकर्त्यांची भेट घेतली. समजूत घातली. त्यानंतर उपोषणाची सांगता झाली. आता ही परीक्षा नव्याने केव्हा होते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. उपोषण मंडपाला राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष लोकपाल गहाणे, उध्दव मेहेंदळे, प्रकाश उईके, विजय खुणे व अनेकांनी भेट दिली.**

# ओबीसी जनगणना करा, वसतिगृह द्या;मंडल यात्रेतून उमटला सूर




**सडक अर्जुनी:** ओबीसींची जनगणना व्हावी, अशी मंडल आयोगाची स्पष्ट भूमिका आहे. परंतु, राजकीय दबावामुळे ती होऊ शकली नाही. इतकेच नव्हे, तर ओबीसी विद्यार्थ्यांचा वसतिगृहाचा मुद्दा आश्वासनापलिकडे पुढे सरकत नाही. त्यामुळे सरकारला जाग यावी, याकरिता विदर्भात मंडल यात्रा सुरू करण्यात आली आहे. या यात्रेचे सोमवारी (ता. ३१) जिल्ह्यात आगमन झाले. ठिकठिकाणी यात्रेचे स्वागत करण्यात आले.

यावेळी ओबीसींची जनगणना झालीच पाहिजे, विद्यार्थ्यांना वसतिगृह मिळालेच पाहिजे, असा सूर उमटताना दिसला.३१ जुलै रोजी दुसऱ्या दिवशी भंडारा जिल्ह्याच्या साकोली तालुक्यातून गोंदिया जिल्ह्याच्या सडक अर्जुनी तालुक्यातील सौदंड येथे यात्रेचे आमगन झाले. सडक अर्जुनी येथील मुख्य चौकातील सभागृहात आयोजित मार्गदर्शन कार्यक्रमात ओबीसी जनजागरण आणि ओबीसींसाठी शासनाचे धोरण काय असावेत, याकरिता मंडल आयोगाची स्थापना झाली होती. यामध्ये सर्वप्रथम संपूर्ण भारतात ओबीसींची जनगणना व्हावी, अशी मंडल आयोगाची भूमिका स्पष्ट होती. परंतु, राजकीय दबावामुळे तसे होऊ शकले नाही. ओबीसी जनगणनेबाबत कोणतीही स्पष्ट भूमिका शासनाने घेतली नाही,याबद्दल माहिती देण्यात आली.

त्यामुळे मंडल यात्रेचे संयोजक उमेश कोर्राम यांच्या नेतृत्वात ३० जुलैपासून मंडल यात्रा नागपूर येथील सविंधान चौकातून सुरू करण्यात आली आहे. मंडल आयोग आणि ओबीसी आरक्षण व जनगणनेचे महत्व या यात्रेच्या माध्यमातून समाजबांधवांपुढे मांडले जात आहे. महाज्योती या संस्थेची माहितीदेखील दिली जात आहे.

यावेळी मंचावर संघर्ष वाहिनीचे दिनानाथ वाघमारे, ओबीसी सेवा संघ चंद्रपूरचे प्रा.अनिल डहाके, ओबीसी अधिकार मंचचे सयोंजक खेमेंद्र कटरे, अशोक लंजे, प्रशांत बेले, माजी नगराध्यक्ष देवचंद तरोणे, अविनाश काशिवार, अनिल राजगिरे, माधव तरोणे, रोशन बडोले, रमेश लांजेवार, एफ.आर.टी शहा, श्रीमती मेंढे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

शाळा महाविद्यालयाच्या विद्यार्थी व विद्यार्थीनी मंडल आयोग लागू करा,वसतीगृह सुरु कराच्या घोषणा देत उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. संचालन व आभार ओबीसी सघंर्ष कृती समितीचे तालुका अध्यक्ष दिनेश हुकरे यांनी केले.त्यानंतर ही यात्रा गोरेगावच्या दिशेने रवाना झाली.विशेष म्हणजे पोलीस प्रशासनाचे या यात्रेला सहकार्य मिळाले.




### अदानी फाऊंडेशनच्यावतीने विविध प्रकारच्या वृक्षांचे वाटप

**तिरोडा:** अदानी फाउंडेशन तिरोडा द्वारा राबविण्यात येत असलेल्या ङ्गवृक्ष से विकासफ या कार्यक्रमांतर्गत तिरोडा तालुक्यातील ५० गावातील ३०० शेतकऱ्यांना आंबा, फणस, पेरू, जांभूळ, सागवान, बकान, मोहगणी, ताम्हण, अशोका यासारख्या फळ झाडे तसेच इमारती लाकूड देणाऱ्या झाडांचा वाटप अदानी पावर प्रमुख कांती बिश्वास यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आला.

अदानी फाउंडेशन हेड बीमुल पटेल यांनी अदानी समूहाचा २०३० पर्यत एक ट्रिलियन वृक्ष लागवड मोहिमेत या उपक्रमाद्वारे हातभार लागेल व पर्यावरण आणि अर्थव्यवस्थेत योगदान देणाऱ्या स्थानिक प्रजातींच्या वृक्षांची संख्या वाढविण्यास वृक्ष से विकास हा कार्यक्रम महत्त्वाचा ठरेल असे सांगितले. तसेच अदानी फाउंडेशन चे कार्यक्रमाधिकारी कैलास रेवतकर यांनी वृक्ष से विकास या कार्यक्रमाच्या माध्यमातून शेतकऱ्यांनी फळझाडे व इमारती लाकूड देणाऱ्या झाडांची लागवड केल्याने त्यांना अधिकचे उत्पादन मिळेल व तसेच पर्यावरण रक्षणाकरिता हातभार लागेल या उद्देशाने अदानी फाउंडेशन द्वारा आम्ही हा उपक्रम राबवित आहोत असे सांगितले.







